सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ वर्ष - तिसरे अंक १३१ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सीबीएसईची नववीची परीक्षा आता 'ओपन बुक' पद्धतीने




नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) नववीच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षेची पद्धत बदलण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. यानुसार, यापुढे नववीच्या परीक्षा 'ओपन बुक' पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. या पद्धतीत विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान आपली पाठ्यपुस्तके, नोट्स आणि संदर्भग्रंथ सोबत ठेवण्याची परवानगी असेल.

सीबीएसईचा उद्देश केवळ पाठांतरावर आधारित परीक्षा न घेता, विद्यार्थ्यांच्या संकल्पना समजून घेण्याची व त्यांचा वापर करण्याची क्षमता तपासणे हा आहे.

मंडळाने स्पष्ट केले की, परीक्षेचा ताण कमी करून संकल्पनांच्या स्पष्टीकरणावर अधिक भर दिला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे विषयांवरील आकलन वाढेल आणि शिक्षण पद्धतीत सकारात्मक बदल घडेल.

## अर्थमंत्र्यांनी फेदबदलासह मांडलेले नवे इन्कम टॅक्स कायदा लोकसभेत मंजूर

### विरोधक भडकले

नवी दिल्ली : लोकसभेत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पुन्हा नव्याने इन्कम टॅक्स बिल संसदेत सादर केले आहे. लोकसभेच्या सत्रात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नव्याने बील लोकसभेत सा दर केले आहे. नुकतेच सरकारने पुनर्रचित नवीन बील मागे घेऊन त्रुटी दूर करणार असल्याचे सांगत इन्कम टॅक्स बिल रद्द केले होते त्याला नव्याने फेरबदल करत अर्थमंत्री यांनी नवे बील पारित केले आहे. मात्र यावेळी कुठलीही चर्चा न होता हे बील पारित झाले आहे. यानंतर विरोधकांचा पारा चढला होता. अर्थमंत्र्यांनी सादर केलेले बील कुठल्याही चर्चेशिवाय घेत केवळ आवाजी मतदाना ने मंजूर झाले आहे. त्यामुळे विरोधकांचा विरोध असला तरी बील पास झाले.सरकारने तज्ज्ञांच्या मदतीने आयकर कायद्यात फेरबदल केले आहेत. तसेच औद्योगिक विश्वात तसेच नागरिकांचे मत जा णून नव्या बीलात आवश्यक ते बदल केले होते.



आयकर कायदा १९६१ सालचा कायदा पुनर्जीवित करून सरकारने फेब्रुवारी महिन्यात लोकसभेत मांडले होते. जुन्या कायद्यातील क्लिष्ट भाषा बदलत तसेच अनावश्यक तरतूदी काढत कायद्याचे सरलीकरण करण्याचे ठरविले होते. मात्र अंतिम मसुदाही पुनः बदलण्यात आला आहे. कायद्यातील त्रुटी दूर करत भाषेचा एकच अर्थ काढता यावा यासाठी हा ८ ऑगस्टला बदल पुन्हा अर्थखात्या कडून करण्यात आला होता व पूर्वाश्रमीचा नवीन कायदा रद्दबातल करत फेरबदल करण्याचे जाहीर केले होते ज्याला अंतिम मंजुरी आज लोकसभेत मिळाली आहे.'सिलेक्ट कमिटीच्या जवळजव ळ सर्व शिफारशी सरकारने स्वीकारल्या आहेत. याशिवाय,प्रस्तावित कायदेशीर अर्थ अधिक अचूकपणे व्यक्त करण्यासाठी भागधारकांकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत' असे विधेयकाच्या उद्दिष्टे आणि कारणांच्या निवेदनात म्हटले आहे.

'मसुदा तयार करण्याच्या स्वरूपामध्ये, वाक्यांशांचे सरेखन परिणामी बदल आणि क्रॉस-रेफरन्सिंगमध्ये सुधारणा आहेत. म्हणूनच, सिलेक्ट कमिटीने अहवाल दिल्यानुसार, सर कारने आयकर विधेयक, २०२५ मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, आयकर कायदा, १९६१ ची जागा घेण्यासाठी आयकर (क्रमांक २) विधेयक २०२५ तयार करण्यात आले आहे' असे नि वेदनात म्हटले आहे.

चार महिन्यांच्या सखोल पुनरावलोकनानंतर समितीने २८५ हून अधिक शिफारशींसह ४५०० पानांचा अहवाल तयार केला होता. या सूचनांचा उद्देश कायद्याची भाषा सोपी करणे, तरतु दींमध्ये स्पष्टता आणणे आणि करदात्यांना अनुपालन सोपे करणे हा होता. आता सरकारने या बदलांचा समावेश असलेला बदलासह एक नवीन मसुदा सादर केला आहे.

## १ सप्टेंबरपासून दिल्ली-वॉशिंग्टन उड्डाण सेवा बंद होणार! एअर इंडियाने केले जाहीर

नवी दिल्ली : एअर इंडियाने सोमवारी घोषणा केली की ते १ सप्टेंबर २०२५ पासून दिल्ली-वॉशिंग्टन डीसी दरम्यान थेट उड्डाण सेवा बंद करणार आहे. कंपनीने सांगितले की हा निर्णय अनेक कारणांमुळे घेण्यात आला आहे, जेणेकरून त्यांच्या उर्वरित उड्डाणे कोणत्याही समस्येशिवाय आणि वेळेवर सुरू राहतील.

प्रवाशांना परतफेड किंवा रीबुकिंगचा पर्याय मिळेल

एअरलाइनच्या मते, ही उड्डाण सेवा स्थगित करण्याचे मुख्य कारण म्हणजे विमानांच्या ताफ्यात घट. एअर इंडियाने गेल्या महिन्यात त्यांच्या २६ बोईंग ७८७-८ विमानांचे मोठ्या प्रमाणात रेट्रोफिट (आधुनिकीकरण) कार्यक्रम सुरू केले आहे. जे २०२६ च्या अखेरीपर्यंत सुरू राहणार आहे. या प्रक्रियेदरम्यान, एकाच वेळी अनेक विमाने सेवेबाहेर राहणार असल्याचे एअरलाइनने सांगितले आहे. तसेच, पाकिस्तान हवाई हद्दीचे मार्ग सतत बंद राहत असल्याने लांब पल्ल्याच्या विमानांच्या मार्गात आणखीन वाढ होते, ज्यामुळे काम अधिक गुंतागुंतीचे होते.

कंपनीने म्हटले आहे की, १ सप्टेंबर २०२५ नंतर वॉशिंग्टन डीसीसाठी बुकिंग करणाऱ्या प्रवाशांशी संपर्क साधला जाईल आणि त्यांना पर्यायी प्रवास उपलब्ध करून दिले जातील. ज्यामध्ये इतर फ्लाइट्सचे पुन्हा बुकिंग करणे किंवा पूर्ण परतफेड करता येऊ शकते.

वॉशिंग्टनला वन स्टॉप फ्लाइटने पोहोचण्यासाठी पर्याय

प्रवाशांना अजूनही एअर इंडियाच्या इंटरलाइन भागीदार - अलास्का एअरलाइन्स, युनायटेड एअरलाइन्स आणि डेल्टा एअरलाइन्स - द्वारे न्यू यॉर्क (जेएफके), नेवार्क (ईडब्ल्यूआर), शिकागो आणि सॅन फ्रान्सिस्को येथूनवन-स्टॉप फ्लाइट घेऊन वॉशिंग्टन डीसीला जाता येईल. ज्यामध्ये त्यांचे सामान थेट अंतिम गंतव्यस्थानापर्यंत सुरक्षित ठेवले जाईल.

## भारत अण्वस्त्रांच्या धमक्यांसमोर कधीही झुकणार नाही - परराष्ट्र मंत्रालय

नवी दिल्ली , ११ ऑगस्ट - पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर हे सध्या अमेरिका दौऱ्यावर असून त्यांनी भारताला अमेरिकेतून अणु हल्ल्याची धमकी दिली. या धमकीला आता भारताने सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. भारताने अशा धमक्यांपुढे झुकणार नसल्याचे स्पष्ट करत मुनीर यांच्या विधानाला बेजबाबदार म्हटले आहे.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हंटल आहे कि, अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी दिलेल्या तथाकथित वक्तव्यांची आम्ही नोंद घेतली आहे. अण्वस्त्रांची धमकी देणे ही पाकिस्तानची सवय बनली आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय अशा वक्तव्यांमध्ये असलेल्या गैरजबाबदारीबाबत स्वतःचे निष्कर्ष काढू शकतो.परराष्ट्र मंत्रालयाने पुढे म्हटले की, मुनीर यांचे विधान अशा देशातील अण्वस्त्र नियंत्रण आणि कमांडच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करते, जिथे लष्कराचे संबंध दहशतवादी संघटनांशी आहेत. हेही खेदजनक आहे की ही विधाने एखाद्या मित्र देशाच्या भूमीवरून करण्यात आली आहेत. भारताने यापूर्वीच स्पष्ट सांगितले आहे की, तो अण्वस्त्रांच्या धमक्यांसमोर कधीही झुकणार नाही. आम्ही आमच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या रक्षणासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलत राहू.

भारत सरकारच्या सूत्रांनी म्हटले की, ज्यावेळी अमेरिका पाकिस्तानी सैन्यासोबत उभी राहते तेव्हा तेथील सैन्य आपला आक्रमक चेहरा दाखवू लागते. यावेळीही अमेरिकेचा पाठिंबा मिळाल्यानंतर, पाकिस्तानी लष्करप्रमुखांनी उघडपणे धमकी दिली आहे. येणाऱ्या काही दिवसात पाकिस्तानमध्ये सत्तापालट होऊ शकते. असीम मुनीर पाकिस्तानचे पंतप्रधान होऊ शकतात. पाकिस्तानमधील अण्वस्त्रांच्या सुरक्षेला गंभीर धोका असल्याचे भारतीय सरकारी सूत्रांचे मत आहे. ही शस्त्रे दहशतवादी आणि बेजबाबदार लोकांच्या हाती लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, असंही सांगण्यात येत आहे.

दरम्यान, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर दुसऱ्यांदा अमेरिका दौऱ्यावर आहेत. येथे भारताविरोधात गरळ ओकता-ओकता त्यांच्या मुखातून पुन्हा एकदा सत्य बाहेर पडले आहे. भारत एक चकचकित मर्सिडिज, तर पाकिस्तान कचरा वाहून नेणारा डंपिंग ट्रक आहे, असे म्हणत असीम मुनीर यांनी पाकिस्तानची आब्रू पार जगाच्या वेशीवर टांगली आहे. ते अमेरिकेतील फ्लोरिडा येथील टॅम्पा येथे एका ब्लॅक टाय डिनर पार्टीला उपस्थित होते. पाकिस्तानी व्यापारी अदनान असद यांनी या पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी ऑपरेशन सिंदूरसंदर्भात बोलताना मुनीर यांनी अमेरिकेत आपली भडसा काढली.भारताला धमकी देताना मुनीर म्हणाले, जर भारतामुळे पाकिस्तानचे अस्तित्व धोक्यात आले, तर पाकिस्तान अर्ध्या जगाला आपल्या सोबत घेऊन बुडेल.

## देशभर पावसाचा कहर; जनजीवन विस्कळीत

नवी दिल्ली, ११ ऑगस्ट - देशातील अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. उत्तर प्रदेश, बिहार, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड व मध्य प्रदेशात पावसाने हाहाकार माजवला आहे. अनेक ठिकाणी नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत, तर भूस्खलनामुळे रस्ते बंद झाले आहेत. आतापर्यंत शेकडो गावांतील लाखो लोकांना स्थलांतर करावे लागले असून, अनेक ठिकाणी बचावकार्य सुरू आहे. हिमाचल प्रदेशात मुसळधार पावसामुळे भूस्खलनाची मालिका सुरूच आहे. ऑट-सैंज मार्ग (राष्ट्रीय महामार्ग-३०५) बंद झाला असून, यावर्षीच्या पावसाळ्यात आतापर्यंत ११६ जणांचा मृत्यू झाला आहे.

## छ. संभाजीनगर रेल्वे स्थानक परिसरातील विकास कामांची खा. भागवत कराड यांनी केली पाहणी

छत्रपती संभाजीनगर, ११ ऑगस्ट : छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानक येथे विविध विकासकामांबाबत आढावा घेत असताना छत्रपती संभाजीनगरचे भाजप नेते राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड यांनी छत्रपती संभाजी नगर स्थानक परिसरातील सुरू असलेल्या विकास कामांची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिति घेण्यात आली.

प्रवाशांच्या सोयी-सुविधा वाढवण्यासाठी, स्थानक परिसर अधिक सुटसुटीत, सुरक्षित आणि आधुनिक बनवण्यासाठी योग्य त्या पायाभूत सुविधा उभारल्या जातील. शहरातील प्रवाशांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होण्यासाठी आणि रेल्वे स्थानक हे शहराच्या विकासाचा महत्वाचा केंद्रबिंदू ठरावा यासाठी आवश्यक ते प्रयत्न सातत्याने केले जातील.



## कुंडेश्वराच्या दर्शनाला जाणारे वाहन दरीत कोसळून ९ ठार, २९ गंभीर जखमी

### पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांकडून आर्थिक मदत जाहीर

पुणे, ११ ऑगस्ट - येथील खेड तालुक्यात पिकअप वाहन १०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातामध्ये नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर २९ जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त गाडीतील भाविक महिला तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त कुंडेश्वराच्या दर्शनाला जात होत्या. या दुर्घटनेतील जखमींना खासगी रुग्णालय आणि चांडोली ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून काहींची प्रकृती गंभीर आहे. सर्व अपघातग्रस्त एकाच गावचे आहेत. पापळवाडी गावचे हे रहिवासी आहेत.



या दुर्घटनेची माहिती मिळताच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला असून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारतर्फे ४ लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवार निमित्ताने दर्शनासाठी जात असताना हा अपघात झाला. पापळवाडी गावातील ४० जण कुंडेश्वर दर्शनाला निघाले होते. यावेळी खेड येथील पाईट गावाजवळ नागमोडी वळणावर घाट चढताना गाडीवरील नियंत्रण सुटल्याने पिकअप जिप (एमएच १४ जीडी ७२९९) १०० फूट खोल दरीत कोसळली. महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा अपघात झाला. अंदाजे २५ ते ३० फूट खाली रस्त्याच्या उतारावरून कोसळली.

स्थानिक तातडीने अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून आले.

## अमेरिकन अर्थव्यवस्थेला थेट फटका ट्रम्पच्या निर्णयाने कंपन्यांची घबराट

वॉशिंग्टन : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतातून आयात होणाऱ्या काही वस्तूंवर तब्बल ५० टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला असून, यामुळे भारताला मोठा आर्थिक धक्का बसला आहे. या निर्णयामुळे दोन्ही देशांमधील व्यापारसंबंधांवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ट्रम्प यांच्या या कठोर धोरणामुळे भारत-अमेरिका संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला असून, काही मैत्रीपूर्ण देशांनी भारताच्या बाजूने उघडपणे पाठिंबा जाहीर केला आहे. दरम्यान, अमेरिकेतील काही प्रमुख नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ट्रम्प यांच्या अटी न मानण्याचे आवाहन केले आहे. या घडामोडीमुळे अमेरिका भारतावर राजकीय आणि आर्थिक दबाव टाकण्याचा प्रयत्न करत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, अमेरिकेतीलच काही व्यापारी संघटना आणि नागरिकांनी या टॅरिफ निर्णयाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे देशांतर्गत स्तरावरही ट्रम्प यांच्या धोरणाला विरोधाचा सूर वाढत चालला आहे.

अमेरिकेवर आधीच प्रचंड कर्जाचा बोजा असताना, माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या टॅरिफ धोरणामुळे अमेरिकन अर्थव्यवस्थेवर मंदीचा धोका अधिक गडद झाला आहे. या निर्णयामुळे केवळ आंतरराष्ट्रीय व्यापारावरच नव्हे तर देशांतर्गत आर्थिक स्थैर्यावरही गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. क्रेडिट रेटिंग एजन्सी मूडीज च्या विश्लेषकांच्या मते, वाढती महागाई, रोजगार बाजारातील अनिश्चितता, अस्थिर शेअर बाजार आणि धोरणात्मक आव्हाने या सर्व घटकांमुळे अमेरिकेची आर्थिक स्थिरता डळमळीत झाली आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सुमारे ९० टक्के अमेरिकन नागरिक सतत वाढणाऱ्या अन्नधान्याच्या किमतीमुळे चिंतेत आहेत. याशिवाय, घरभाड्याचा प्रचंड वाढलेला खर्चही अमेरिकन जनतेच्या चिंता वाढवत आहे. या आर्थिक दबावाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी टॅरिफ वाढविण्याचा निर्णय घेतल्याने नागरिकांमध्ये आणि व्यावसायिक समुदायात खळबळ उडाली आहे.

अमेरिकन अर्थव्यवस्थेवर मंदीचे संकट अधिक गडद होत चालले आहे. राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीच्या प्रचारावेळी डोनाल्ड ट्रम्प यांनी महागाई कमी करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सध्याच्या परिस्थितीकडे पाहता त्या आश्वासनाचे वास्तवाशी फारसे साधर्म्य दिसत नाही. उलट महागाईचा वेग वाढला असून, सामान्य नागरिकांच्या जगण्याचा खर्च प्रचंड वाढला आहे. नवीन सर्वेक्षणांनुसार, वाढते अन्नधान्य दर आणि घरभाड्याचा वाढता बोजा ही अमेरिकन जनतेसमोरची दोन मोठी आव्हाने ठरली आहेत. अनेक नागरिक किरकोळ खरेदीसाठीही 'खरेदी करा आणि नंतर पैसे द्या' या सेवांवर अवलंबून राहू लागले आहेत. ही प्रवृत्ती अर्थतज्ज्ञांच्या मते, आर्थिक अस्थैर्याची गंभीर लक्षणे दर्शवते. यात भर म्हणजे ट्रम्प यांच्या नव्या टॅरिफ धोरणामुळे देशांतर्गत महागाई आणखी वाढण्याची शक्यता आहे. व्यापार तज्ज्ञांचे मत आहे की, यामुळे केवळ बाजारपेठच नाही तर सामान्य अमेरिकन कुटुंबांचे आर्थिक दिवाळेही निघू शकते. या पार्श्वभूमीवर सरकारने तातडीने प्रभावी आर्थिक उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

ताज्या सर्वेक्षणानुसार, अमेरिकेत लवकरच दैनंदिन जीवनातील जवळपास प्रत्येक वस्तूच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. अन्नधान्य, इंधन, घरभाडे यांसारख्या आवश्यक सेवांसोबतच वाहतूक क्षेत्रालाही या महागाईचा मोठा फटका बसू शकतो. विशेषत: माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या टॅरिफ धोरणामुळे अमेरिकेतील कार उद्योगावर गंभीर परिणाम होत असल्याचे संकेत मिळत आहेत. प्रमुख कार कंपन्यांनी यावर थेट प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली असून, टॅरिफमुळे त्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होऊन नफा धोक्यात येऊ शकतो, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे. उद्योग विश्लेषकांचे म्हणणे आहे की, जागतिक स्तरावर स्पर्धात्मक राहण्यासाठी अमेरिकन वाहन उत्पादकांवर प्रचंड दबाव निर्माण होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, ट्रम्प यांचे हे धोरण दीर्घकालीन पातळीवर त्यांच्याच आर्थिक धोरणांना मारक ठरू शकते.

## सोन्याच्या दर मोठ्या प्रमाणात घसरले

मुंबई : आज अखेर दबाव घटल्याने सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. जागतिक पातळीवर दबाव ट्रम्प आणि पुतीन यांच्या भेटीचे वृत्त प्रसारमाध्यमांनी दिल्यानंतर सोन्याच्या दरात आज घस रण झाली आहे. विशेषतः मागणीत घट झाल्याने तसेच रशिया अमेरिका समझोता होईल या आशावादी विचाराचा बाजारात सकारात्मक परिणाम झाला ज्याचा सर्वाधिक फायदा सोने व कच्च्या ते लात (उँीविश जळश्र) मध्ये झाला आहे. ज्यामुळे आज दिवसभरात दोन्ही कमोडिटी बाजारातील स्पॉट मागणीतही घसरण झाली. अमेरिकेतील बाजारानेही काल उसळी घेतल्याने आगामी महागाई आकडेवारीवर गुंतवणूकदार सकारात्मक आहेत.



'ग ु ड ि र ट न स ॅ' संकेतस्थळावरील माहितीनुसार, सोन्याच्या २४ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात तब्बल ७६ रूपये घसरण झाली आहे. २२ कॅरेट सोन्याच्या प्रति ग्रॅम दरात ७० रूपयांनी व १८ कॅरेट सो न्याच्या प्रति ग्रॅम दरात ५७ रूपयांनी घसरण झाली. ज्यामुळे प्रति ग्रॅम दर अनुक्रमे २४ कॅरेटसाठी १०२२८ रूपये, २२ कॅरेटसाठी ९३७५ रूपये, १८ कॅरेटसाठी ७६८१ रूपयांवर पोहोचला आहे. सं केतस्थळावरील माहितीनुसार, २४ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत ७६० रूपयांनी, व २२ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत ७०० रूपयांनी, १८ कॅरेट सोन्याच्या प्रति तोळा किंमतीत ५७० रूपयांनी घसरण झाली. त्यामुळे एकूणच तोळ्याचे दर अनुक्रमे २४ कॅरेटसाठी १०२२८० रूपये, २१ कॅरेटसाठी ९३७५० रूपये, १८ कॅरेटसाठी ७६७१० रूपयांवर गेले आहेत.

जागतिक सोन्याच्या गोल्ड फ्युचर निर्देशांकात संध्याकाळपर्यंत २.२०% घसरण झाली आहे. तर जागतिक मानक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या युएस गोल्ड स्पॉट दरात १.२०% घसरण झाल्याने सं ध्याकाळपर्यंत सोन्याचे दर प्रति डॉलर ३३५८.५८ औंसवर गेले आहेत. मुंबईसह भारतातील प्रमुख शहरातील सोन्याचे सरासरी दर प्रति ग्रॅम २४ कॅरेटसाठी १०२२८ रूपये, २२ कॅरेटसाठी ९३७५ रूपये, १८ कॅरेटसाठी ७६७१ रूपये आहे.

भारतातील कमोडिटी बाजारातील एमसीएक्स मध्ये सोन्याचे दर संध्याकाळपर्यंत १.२०% घसरून १००५७९ पातळीवर गेले आहेत. आज सोन्याच्या दरा त भारतीय सराफा बाजारात चांगली घसरण झाली. सलग दुसऱ्यांदा ही घसरण झाली आहे. बाजारातील मागणीत घट झाल्यासह भारतातील सोन्याच्या ट्रेडिंगमध्ये झालेल्या घसरणीचा फटका दरा त प्रतिबिंबित होतो. आगामी काळात युएसची नवीन महागाई आकडेवारी अपेक्षित आहे. तसेच चीन युएस बोलणी, युएस रशिया बोलणी यामुळे लोकांनी सकारात्मकतेत सोन्यातील गुंतवणूक क मी केल्याने ही घसरण झाली.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जागतिक आदिवासी दिन विविध उपक्रमाद्वारे साजरा



गंगाखेड प्रतिनिधी :- शहरातील जयंती उत्सव समिती च्या वतीने पुरुषोत्तम महाराज निवासी मतिमंद शाळा गंगाखेड या ठिकाणी जागतिक आदिवासी दिन १० ऑगस्ट रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये प्रथम वृक्षारोपण करण्यात आले व नंतर पुरुषोत्तम महाराज निवासी मतिमंद शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभलेले मदनराव शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले बंडू सौंदळे, पत्रकार आनंद शिंदे, बालासाहेब यादव, खोंड सर, कुंडगीर सर उपस्थित होते.

राम पुपलवाड यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने मित्रपरिवार कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी परिश्रम राम पुपलवाड, कल्याण आळसे, प्रशांत रोडे, दत्तराव जाधव, उत्कर्ष देशमुख, प्रा आतिश खंदारे, अमोल फुलारे, शुभम भिसे, आशिष यादव, किरण कौशी, अजय फुलारे व तसेच स्नेहा गणेश मंडळातील सदस्य व श्रीकृष्ण ग्रुपचे सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांचा बुधवारी परभणी दौरा : गाठीभेटी आणि संवाद

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील हे बुधवारी परभणीत दाखल होणार असून ते मुंबई येथील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शहरासह जिल्ह्यातील पदाधिकार्यांसह कार्यकर्त्यांबरोबर हितगुज करणार आहेत. वसमत रस्त्यावरील सावली या शासकीय विश्रामगृहावर जरांगे हे सकाळी ९ वाजल्यापासून दिवसभर मराठा समाजातील व्यापारी, उद्योजक, डॉक्टर्स, वकील तसेच राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांच्या गाठीभेटी घेणार आहेत. त्यातून ते मुंबईच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर विचार विनिमय करणार आहेत.

# विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे १३ ऑगस्ट रोजी परभणी जिल्हा दौऱ्यावर



परभणी, दि. ११ : विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे हे १३ ऑगस्ट २०२५ रोजी परभणी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. दुपारी १.०० वा. अहिल्यानगर येथून शासकीय वाहनाने परभणीकडे प्रयाण. सायंकाळी ६.०० वा. अक्षदा मंगल कार्यालय, कृषी विद्यापीठ रोड, परभणी येथे आगमन व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुण्यतिथीनिमित्त आयोजित कै. दत्तराव रौंदळे व कै. गंगाबाई दत्तराव रौंदळे स्मृती व्याख्यानमाला व पुरस्कार वितरण समारंभास उपस्थिती. रात्री ७.५० वा. रेल्वेस्थानककडे प्रयाण. रात्री ८.२० वा. परभणी रेल्वेस्थानक येथून देवगिरी एक्सप्रेसने मुंबईकडे प्रयाण करतील.

# लव्हस्टोरी, घोस्ट कॉमेडीचा धमाका, 'बेटर-हाफची लव्हस्टोरी'चा भन्नाट ट्रेलर प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - प्रेम, भूत आणि हास्याचा भन्नाट मेळ घालणारा आगामी मराठी चित्रपट 'बेटर-हाफची लव्हस्टोरी' सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. या घोस्ट कॉमेडीचा दमदार ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून प्रेक्षकांच्या उत्सुकतेला अधिकच उधाण आले आहे. सुबोध भावे आणि रिंकू राजगुरू ही हटके जोडी या चित्रपटाच्या निमित्ताने मोठ्या पडद्यावर धमाल उडवायला सज्ज झाली आहे. या आधी 'पालतू फालतू' या मजेशीर गाण्यामुळे आणि 'ना कळले कधी तुला' या भावनिक गीतामुळे चित्रपटाविषयी कुतूहल निर्माण झालं होतंच, परंतु आता आलेल्या ट्रेलरमुळे प्रेक्षकांना या प्रेमकथेच्या गोंधळातल्या धमाल प्रवासाची झलक पाहायला मिळाली आहे.

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा प्रस्तुत, रजत मीडिया एंटरटेनमेंट निर्मित या सिनेमाच्या ट्रेलरमध्ये एक वेगळी आणि हटके प्रेमकथा उलगडताना दिसते. सुबोध भावे याची 'बेटर-हाफ' म्हणजे पत्नी गेल्यानंतर तिचा आत्मा त्याच्याच शरीरात वास करत असल्याचं गोंधळलेलं चित्र ट्रेलरमध्ये पाहायला मिळतं. त्यातून सुटका मिळवण्यासाठी सुरू होतो विनोदी संघर्ष, ज्यात प्रार्थना बेहरे आणि अनिकेत विश्वासराव यांची त्याला साथ मिळते. आता यातून सुबोध भावाची सुटका होते का, याचे उत्तर मात्र प्रेक्षकांना चित्रपट पाहूनच मिळणार आहे.

# स्वतंत्र प्रयोगशाळेसाठी प्रस्ताव द्यावा- दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.११ - दिवाळीपर्यंतचा चार्तुमास व सणांचा काळ असल्याने व तसेच या कालावधीत पावसाळा असल्याने अन्न व औषध प्रशासनाने बाजारात विक्री होणारे खाद्यपदार्थांची विशेष तपासणी मोहिम राबवावी असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. तसेच जिल्ह्यासाठी स्वतंत्र अन्न औषध प्रशासन विभागाची अन्न व नमुने तपासणी प्रयोगशाळा तयार करण्याचा प्रस्ताव द्यावा,असेही निर्देश देण्यात आले.

बाजारात विक्री होणारे खाद्य- अन्न पदार्थ, विविध पेये, पाकीटबंद पदार्थ यांच्या तपासणीबाबत विशेष मोहिम राबविण्यासंदर्भात आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली.अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी यासंदर्भात निर्देश दिले आहेत. या बैठकीस सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन द.वि. पाटील, सहायक आयुक्त निखिल कुलकर्णी, अन्न सुरक्षा अधिकारी श्रीमती प्र.प. सुरसे, श्रीमती सु.त्रि. जाधवर, श्रीमती वर्षा रोडे, एस.बी. तायडे, मो. फ. सिद्दीकी, पी.एस. अंजिठेकर उपस्थित होते.

आगामी सण व उत्सवाच्या काळात जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मिठाई, फरसाण, सुका मेवा अशा अन्नपदार्थांची विक्री होत असते. मागणी जादा असल्याने भेसळीची शक्यता वाढते. अशावेळी घातक घटकांनीयुक्त मिठाईपासून नागरिकांचे रक्षण करणे आवश्यक आहे. नागरिकांना सुरक्षित सकस व निर्भेळ अन्न उपलब्ध व्हावे यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून विशेष मोहिम राबविण्यात यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. या तपासणीत मिठाईचे उत्पादन करणाऱ्या आणि विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी, उत्पादनासाठी वापरण्यात येणारे दुध, खवा, मावा, तूप, साखर, मैदा, आणि इतर घटकांची तपासणी करण्यात येणार आहे. भेसळयुक्त घटकांचा शोध अन्न सुरक्षा आणि मानक कायदा २००६ च्या मार्गदर्शक तत्वानुसार, मिठाईमध्ये वापरण्यात येणारे घटक जसे की खवा मावा, आणि तूप हे भेसळयुक्त आहेत किंवा नाही याची खात्री करण्यात येणार आहे.

# महादेव कोळी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही तत्पर : सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर

परभणी, प्रतिनिधी/

मराठवाड्यातील कोळी महादेव, कोळी मल्हार समस्या आमच्या लक्षात आल्या आहेत, त्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही तत्पर आहोत. त्यासाठी मराठवाड्यातील कोळी महादेव समाजातील शिष्ट मंडळाची बैठक लवकरच मुख्यमंत्री यांच्यासोबत आयोजित करणार आहोत असे प्रतिपादन राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री सौ मेघनाताई साकोरे बोर्डीकर यांनी केले.



बालाघाटातील अनुसूचित जमाती सेवा संघ व आदिम विकास परिषद महाराष्ट्र राज्य शाखा परभणी च्या वतीने आयोजित जागतिक आदिवासी दिनानिमित्त कोळी महादेव समाजातील गुणवंतांचा सत्कार समारंभ व समाज जागृती मेळावा येथील श्री राम मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री सौ. मेघनाताई साकोरे बोर्डीकर तर उद्घाटक म्हणून परभणी भाजपा लोकसभा समन्वयक डॉ .केदार कटिंग, आदिम विकास परिषदेचे अध्यक्ष अविनाशजी कोळी, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरेश भुमरे, भाजपा महानगराध्यक्ष शिवाजी भरोसे, समाजाचे ज्येष्ठ नेते निवृत्ती रेखडगेवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

मराठवाड्यातील बालाघाट महादेव डोंगर रांगा ह्या कोळी महादेव, कोळी मल्हार जमातीचे मूळ वस्तीस्थानआहे याचे संदर्भ ब्रिटिश कालीन अहमदनगर १८८१ ठाणे १८८२ गॅझेट मध्ये आढळतात. कोळी महादेव ,कोळी मल्हार जमातीच्या जुन्या नोंदी सर्वत्र तत्कालीन कायद्यानुसार कोळी झाल्याच्या आणि जात पडताळणी समिती कडून होणारा अन्याय या बाबतीत सविस्तर विश्लेषण प्रास्ताविकात समाजाचे गाढ अभ्यासक रमेश पिठ्ठलवाड यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. केदार खटिंग यांनी केले. त्यांनी मनोगत व्यक्त करताना परभणी जिल्ह्यातील कोळी महादेव जमातीच्या उन्नतीसाठी मी नेहमी प्रयत्न करत आहे आणि मी या समाजासोबत आहे असे म्हणाले. यावेळी आदिम विकास परिषदेचे अध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले की, कोळी महादेव समाजातील युवक शिकत आहेत, संघटन होत आहे पण जात वैधता प्रमाणपत्र साठी अडचणी आणल्या जात असल्यामुळे समाजात बेरोजगारी वाढत आहे. आदिवासी दिनानिमित्त कोळी महादेव समाजातील गुणवंत विद्यार्थी नवनियुक्त कर्मचारी ,अधिकारी समाजभूषण यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश मारेवाड यांनी केले तर आभार प्रदर्शन निवृत्ती रेखडगेवाड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेशराव सूर्यवंशी, अच्युतराव सोगे, रोहिदास एम्बलवाड, अंबादास रेडेवाड, मुरलीधर भंडारवाड, ओम मुदीराज, ड .राजू पिठले, सुनिल पुटेवाड, चंद्रकात बुधवारे, ज्ञानेश्वर सुरवसे, विकास कांबळे यांच्यासह समाज बांधवांनी प्रयत्न केले.

# दैनिक दिलासा व्हिडिओ क्लिप: शिवसेनेच्या उबाठा गटातर्फे परभणीत निदर्शने

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : राज्य सरकारमधील कलंकित भ्रष्ट मंत्र्यांची हाकालपट्टी करावी, या मागणीसाठी शिवसेनेच्या उध्दव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे सोमवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रविंद्र रामकिशन धर्मे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित केलेल्या या निदर्शनात शेकडो



शिवसैनिक व महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या सहभागी झाल्य होत्या.

या आंदोलनकर्त्यांनी आंदोलनस्थळी जोरदार घोषणाबाजी करीत संपूर्ण परिसर दणाणून सोडला. सरकारमधील कलंकित व भ्रष्ट मंत्री हे बेताल वक्तव्य करीत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य शेतकर्यांसह नागरीकांच्या भावनांना ठेच पोहोचते आहे. परंतु, सरकारद्वारे आवाज उठवूनसुध्दा या मंत्र्यांच्या विरोधात काडीमात्र कारवाई होत नाही, हे वास्तव आहे, असे मत शिवसेनेच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकार्यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे केली. दरम्यान, या आंदोलनात माजी सभापती गंगाधरराव आणेराव, रामनाना खराबे, पंढरीनाथ घुले पाटील यांच्यासह अन्य पदाधिकारी सहभागी होते.

# शिक्षणाला डिजिटल पंख - वझर बु प्राथमिक आश्रम शाळेत विद्यार्थ्यांच्या हाती टॅब

जिंतूर - तालुक्यातील वझर बु, येथे .शनिवार ०९ ऑगस्ट रोजी तंत्रज्ञानाच्या युगाशी विद्यार्थ्यांना जुळवून देत दर्जेदार शिक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी वझर बु प्राथमिक आश्रम शाळेत भव्य टॅब वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. डिजिटल साधनांच्या मदतीने विद्यार्थ्यांचा अभ्यास अधिक सुलभ, रोचक व स्पर्धात्मक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



कार्यक्रमात विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप करण्यात आले असून, त्याद्वारे शैक्षणिक ॲप्स, ई-पुस्तके, ऑनलाईन लेक्चर्स, व्हिडिओ सामग्री तसेच चाचण्या यांचा लाभ घेता येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही उच्च गुणवत्तेचे शिक्षण घरबसल्या उपलब्ध होण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

या उपक्रमात मुख्याध्यापक गजानन घेटे यांचे मार्गदर्शन लाभले. सहशिक्षक मन्मथ सांगेकर, प्रदीप बेले, सुनील पजई, पठाण शहेजाद खान, मीना धबडगे, भाग्यश्री घुळघुळे, नंदिनी मोरे, गोविंद खंदारे आणि मधुकर आघाव यांनी विद्यार्थ्यांचे योग्य समन्वयन राखून कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना डिजिटल साधनांचा अभ्यासासाठी जाणीवपूर्वक आणि सकारात्मक वापर करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर टॅब हातात मिळाल्याचा आनंद आणि उत्साह स्पष्टपणे दिसून येत होता.

# एमजीएम विद्यापीठ आणि शांती ब्राझील यांच्यात सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर, दि. ११ : अहिंसा, शांती, सर्वोदय आणि सत्याग्रह या गांधीवादी तत्वज्ञानाचा जागतिक स्तरावर प्रचार आणि प्रसार करण्यासाठी महात्मा गांधी मिशन विद्यापीठ आणि ब्राझीलमधील रिओ दि जानेरो येथील शांती ब्राझील या नागरी समाज संघटनेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. शांती ब्राझीलचे अध्यक्ष लियांड्रो उचोआस रिबेरो आणि एमजीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.



यावेळी, कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या कराराअंतर्गत सत्य आणि अहिंसेवर आधारित न्यायपूर्ण सामाजिक व्यवस्था, आर्थिक-सामाजिक समता, शाश्वत जीवनशैली आणि न्याय-समानतेची संस्कृती विकसित करण्यासाठी दोन्ही संस्थांमध्ये अभ्यास, संशोधन, प्रशिक्षण, परिषदा, कार्यशाळा आणि विद्यार्थी आदानप्रदान कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. तसेच, समान विचारांच्या संस्था व व्यक्तींचे जाळे निर्माण करून संसाधनांचे संयुक्तपणे एकत्रीकरण करण्यात येणार आहे.

सहकार्याच्या प्रमुख बाबींमध्ये गांधीवादी तत्वज्ञानाचा प्रचार, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी, शाश्वतता, हरित ऊर्जा, योग्य तंत्रज्ञानाचा प्रसार, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम, युवक शिखर परिषदा, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, वेबिनार्स तसेच सामाजिक नेतृत्व प्रशिक्षण या गोष्टींचा समावेश आहे. या माध्यमातून भारत आणि ब्राझील यांच्यातील शैक्षणिक-सांस्कृतिक सहकार्य अधिक दृढ होणार असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे.

# संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिर

छत्रपती संभाजीनगर : स्वातंत्र्यदिन तसेच मुक्तिपर्व दिनाचे औचित्य साधून संत निरंकारी मंडळातर्फे दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येत असते याच अनुषंगाने निरंकारी स्वयंसेवक सुमारे एक महिन्यापासून जनमानसात रक्तदान करण्याची भावना निर्माण व्हावी यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

या मध्ये सार्वजनिक ठिकाणी नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांना रक्तदानाचे फायदे समजावून सांगणे तसेच विविध महाविद्यालये, अभ्यासिका, कोचिंग क्लासेस मधील तरुण वर्गाला सुद्धा भेटून रक्तदान करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. संपूर्ण रक्त हे शासकीय विभागीय रक्तपेढी तर्फे संकलित करण्यात येणार असून गरजवंतांना याचा लाभ होईल ही भावना फाऊंडेशन चे सदस्य नागरिकांना सांगत आहेत.निरंकारी सत्संग भवन एन ९ सिडको या ठिकाणी १५ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी ८ ते ४ या वेळेत होणार्या या रक्तदान शिबिरामध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हासंयोजक डी जी दळवी यांनी केले आहे.

# येलदरी जलाशयातील पाणीसाठ्यात ८९ टक्क्यांपर्यंत वाढ

## पूर्णा पाटबंधारे खात्याद्वारे नदीकाठावरील ग्रामस्थांना सतर्कतेचा इशारा; कोणत्याही क्षणी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : खडकपूर्णा प्रकल्पातून २ गेटद्वारे पूर्णा नदीच्या पात्रात पाण्याचा मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु करण्यात आला असून त्यामुळे येलदरी जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रातून येलदरीत मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक सुरु आहे. सोमवारी सकाळी या जलाशयात ८९.७४ टक्के पाणीसाठा उपलब्ध झाला. त्यामुळे नदीपात्रातील पाण्याची आवक ओळखून पाटबंधारे खात्याद्वारे येथून पुढे केंव्हाही येलदरी येथील जलविद्युत केंद्रातील टर्माइनला व नदीपात्रातसुध्दा पाण्याचा विसर्ग केला जाईल, असे जाहीर केले



आहे.

दरम्यान, नदीपात्रावरील शेतकर्यांनी आपआपले नदीपात्रातील साहित्य किंवा जनावरे हटवावीत, असे निर्देश दिले आहेत.

दरम्यान, पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयात सोमवारी ११ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत ८९.७४ टक्के एवढा जिवंत पाणीसाठा उपलब्ध होता. या प्रकल्पाची एकूण साठवण क्षमता ९३४.४४० दलघमी असून यामध्ये १२४.६७० दलघमी हा मृत साठा आहे, तर ८०९.७७० दलघमी जिवंत साठा मानला जातो. सद्यस्थितीत धरणात ७२६.६७५ दलघमी जिवंत तर १२४.६७० मृत पाणीसाठा असून एकूण पाणीसाठा ८५१.३४५ दलघमी इतका झाला आहे. जलाशयातील पाणी पातळी ४६०.९५० मीटर झाली आहे. यामुळे येलदरी धरण सध्या ८९.७४ टक्के क्षमतेने भरलेले आहे. गेल्या २४ तासांमध्ये धरणात १३.२५७/३३५.६२० दलघमी पाण्याची आवक झाली.

# प्रश्नमंजूषा स्पर्धेत सावित्रीबाई फुले विद्यालयाची विद्यार्थीनी प्रथम

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : महानगरपालिकेच्या 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत आयोजित केलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेत सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक पटकावला.

महानगरपालिकेच्या वतीने 'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यापैकी आज सोमवार ११ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता येथील बि. रघुनाथ सभागृहात प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन सहायक आयुक्त आवेज हाश्मी, जुबेर हाश्मी, आस्थापना विभाग प्रमुख शिवाजी सरनाईक आणि क्रीडा अधिकारी राजकुमार जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेत शहरातील शाळा आणि महाविद्यालयांमधील एकूण १७ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. 'स्वातंत्र्यापूर्वीचा आणि नंतरचा भारत' या विषयावर आधारित प्रश्नमंजुषा चार गटांमध्ये घेण्यात आली - एक महाविद्यालयाचा आणि तीन शाळांचे गट. स्पर्धा चार फेर्यांमध्ये पार पडली. निकालांमध्ये सावित्रीबाई फुले विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक, बाल विद्यामंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक, तर शिवाजी कॉलेजच्या विद्यार्थिनींनी तृतीय क्रमांक पटकावला. आदर्श विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. प्रश्नमंजुषा स्पर्धा प्रशिक्षक यशवंत मकरंद, मनिषा उमरीकर आणि विश्वजीत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. विजेत्या स्पर्धकांना आयुक्त धैर्यशील जाधव, उपायुक्त बबन गं. तडवी आणि सहायक आयुक्त प्रज्ञावंत कांबळे यांनी शुभेच्छा दिल्या.

# कावड यात्रेतील दोन भाविकांचा कारने दिलेल्या धडकेने जागीच मृत्यू

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : गोदावरी नदीचे पवित्र पाणी घेऊन पहाटे मोठ्या श्रध्देने व मोठ्या जल्लोषात सेलूकडे निघालेल्या कावड यात्रेतील दोघा भाविकांचा एका भरधाव वेगाने धावणार्या कारने दिलेल्या जोरदार धडकेत मृत्यू झाला. तर अन्य चार भाविक जखमी झाले. सोमवार ११ ऑगस्ट रोजी पहाटे पाथरी तालुक्यातील खेडूळा फाट्याजवळ ही दुर्दैवी घटना घडली.

सेलू तालुक्यातील काही युवकांसह भाविक १० ऑगस्ट रोजी रत्नेश्वर रामपुरी या गोदावरी काठावरील गावी पोहोचले होते. सोमवारी सकाळी ते गोदावरी नदीचे पवित्र पाणी घेऊन पहाटेच मोठ्या श्रध्देने व जल्लोषात सेलूकडे निघाले तेव्हा सकाळी ५.३० वाजेच्या सुमारास खेडूळा पाटीजवळ एम.एच.०३ सी.एच. १२११ या कारने काही भाविकांना जोरदार धडक दिली. त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य चौघे जखमी झाले. प्रत्यक्षदर्शनींनी या घटनेनंतर जखमींना तात्काळ सेलू येथील रुग्णालयात हलविले, तर काहींना पाथरीत हलविण्यात आले. पाथरी पोलिस ठाण्यातील अधिकार्यांसह कर्मचार्यांनी घटनास्थळी धाव घेतली व दोन्ही मृतदेह ताब्यात घेतले. मृतांमध्ये एकनाथ गजमल (रा. डासाळा) व ऋषिकेश शिंदे (रा. दत्त नगर सेलू) या दोघांचा समावेश आहे.या प्रकरणात संबंधित कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. दरम्यान, या कारमध्ये चौघेजण होते, ते घटनास्थळावरुन अपघात झाल्या पाठोपाठ पसार झाले. पोलिसांनी त्या कार चालकाचा शोध सुरु केला आहे.

# युवा फेडरेशनद्वारे परभणीत निदर्शने

## ऑनलाईन जुगार व्यवसायाच्या विरोधात कठोर कारवाईची अपेक्षा

परभणी,दि.११(प्रतिनिधी) : राज्यातील वाढत्या ऑनलाईन जुगारासह बेटींग व्यवसायाच्या विरोधात अखिल भारतीय युवा फेडरेशनच्या कार्यकर्त्यांनी आवाज उठवावा, अशी मागणी अखिल भारतीय युवा फेडरेशनच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

संपूर्ण राज्यासह अन्यत्रसुध्दा इंटरनेट आणि स्मार्ट फोनच्या माध्यमातून ऑनलाईनचा जूगार आणि बेटींग व्यवसाय मोठ्या झपाट्याने वाढतो आहे. तसेच आयपीएल क्रिकेटचे लोण, कॅसिनो गेम्स आणि ॲप्सच्या माध्यमातून लाखो युवक आभासी जगात अडकत आहेत. त्यामुळे त्यांचे कुटूंबिय अक्षरशः अडचणीत आले असून अनेक कुटूंबियांसमोर अनेक प्रश्न उपस्थित राहीले आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व तालुक्यातील ऑनलाई जुगार, बेटींग व्यवसायाच्या विरोधात पोलिस प्रशासनाद्वारे कठोर कारवाई करणे गरजेचे आहे, असे मत युवा फेडरेशनचे संदीप सोळंके, सय्यद अझहर, प्रसाद गोरे, सतिश मस्के, सुरज आहिरे, शेख मोहसीन, शेख असद, शैलेश निखळ, ओंकार पवार, देविदास खरात, वहिद खान आदींनी व्यक्त केले. तसेच आपल्या विविध मागण्यांसदर्भातील निवेदन सादर केले. दरम्यान, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी फेडरेशनच्या या मागणीचे निवेदन स्विकारले व सकारात्मक कारवाई करु, असे आश्वासन दिले.

# वेरूळमध्ये १७ सप्टेंबरला विश्वकर्मावंशीय समाजाचा राज्यस्तरीय मेळावा

## प्रा. नागोराव पांचाळ यांची माहिती

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात आणि समाजकारणात विश्वकर्मावंशीय समाजाला सन्मानाचे स्थान मिळावे. यासाठी आगामी काळात समाजामध्ये जनजागृती होण्यासाठी १७ सप्टेंबर रोजी वेरूळ येथे विश्वकर्मावंशीय समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विश्वकर्मावंशीय समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोराव पांचाळ यांनी केले आहे.


सोमवारी, ११ रोजी श्रीक्षेत्र वेरूळमध्ये समाजाच्या राज्य अधिवेशनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित बैठकीत प्रमुख मार्गदर्शक म्हणून पांचाळ बोलत होते. नियोजन समितीचे अध्यक्ष राजेश नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष अरुण भालेकर, सचिव विलास पवार, प्रदेश प्रसिद्धी प्रमुख भगवान राऊत, कोषाध्यक्ष गणेश गव्हाणे, पश्चिम विभागीय अध्यक्ष राजकुमार राऊत, कोषाध्यक्ष गणेश गव्हाणे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष प्रसाद गडकर, सचिव अशोक गोरे, परभणी जिल्हाध्यक्ष सर्जेराव कळसकर, जिल्हा सरचिटणीस श्याम चाफेकर, अमरावती विभागीय अध्यक्ष गणेश लाटेकर, जिल्हाध्यक्ष प्रसाद बेलकर, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष परमेश्वर पांचाळ, जालना जिल्ह्याचे उपाध्यक्ष बाळासाहेब जाधव, छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा सचिव बालाजी पांचाळ, उपाध्यक्ष व्यंकट पांचाळ, अमरावतीचे शहराध्यक्ष सुधीर कामेरकर, युवा अध्यक्ष नितीन माऊलकर, वाळुंज महानगर अध्यक्ष अरुण वाघमारे, कोषाध्यक्ष दत्तराव पांचाळ, गणेश जाधव, केशव सपकाळ आदी बैठकीस उपस्थित होते.

याप्रसंगी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सुतार समाज बांधवांचा प्रातिनिधिक स्वरूपात गौरव केला जाणार आहे, तरी या कार्यक्रमास सुतार समाज बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन नियोजन समितीचे अध्यक्ष राजेश नागापुरे यांच्यासह संयोजन समितीने केले आहे.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## भा.ज.पा.च्या जिल्हा उपाध्यक्षपदी सौ. सुचित्रा जोशी



पैठण दि ११:- पैठण च्या माजी उपनगराध्यक्षा सौ.सुचित्रा महेश जोशी यांची भा.ज.पा.च्या छत्रपती संभाजीनगर ( उत्तर ) ग्रामीण उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भा.ज.पा.जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांनी त्यांच्या निवडीचे पत्र दिले आहे. या निवडीबद्दल मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे,मा. केंद्रीय मंत्री डॉ.भागवत कराड,महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल सावे,आ. संजय केनेकर,प्रविण घुगे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ,पुष्पाताई काळे,रेखाताई कुलकर्णी,तुषार शिसोदे,बप्पा शेळके,शहर मंडळ अध्यक्ष बंडू आंधळे,दिलीपकाका पोहेकर,कांताबापू औटे,लक्ष्मण औटे,सुरज लोळगे,विजय चाटूपळे,सुरेश गायकवाड,रमेश पाठक, लक्ष्मीकांत पसारे,शरद बिडकर, सुनिल रासने,शिवाजी तुपे,अश्विनी लखमले व सर्व पदाधिकाऱ्यांनी सौ.जोशी यांचे अभिनंदन केले आहे.

## छत्रपती संभाजीनगर भाजपा जिल्हा चिटणीसपदी सुनील गावंडे तर भाजपा सोयगाव शहराध्यक्षपदी मंगेश सोहनी



सोयगाव,दि.११ ऑगस्ट – सोयगाव येथील छत्रपती संभाजीनगर भाजपा जिल्हा चिटणीस पदी सुनील गावंडे यांची निवड करण्यात आली आहे.तर सोयगाव तालुका खरेदी विक्री संघाचे संचालक मंगेश सोहनी यांची सोयगाव भाजपा शहर अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर भाजपाचे जिल्हा अध्यक्ष सुहास शिरसाट यांनी ही निवड केली आहे.त्यांच्या निवडी बद्दल त्यांचे भाजपाचे नेते माजी खासदार रावसाहेब दानवे पाटील,जिल्हा परिषद माजी सदस्य पुष्पाताई काळे,भाजपा प्रदेश सचिव सुरेश बनकर पाटील,अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी,माजी नगराध्यक्ष कैलास काळे,भाजपाचे नेते वसंत बनकर,भाजपाचे सोयगाव तालुकाध्यक्ष संजय पाटील, उपतालुका अध्यक्ष योगेश पाटील,नगरसेवक राजेंद्र जावळे, मयुर मनगटे,दिलीप चौधरी,भाजपच्या महिला तालुका अध्यक्ष नंदाताई आगे,संजय चौधरी आदींनी अभिनंदन केले आहे.त्यांच्या निवडी बद्दल त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

## एसआयपी ॲकॅडमीचा २२ वर्षे पूर्तीचा आनंदोत्सव

छत्रपती संभाजीनगर : बालकांच्या कौशल्य विकास क्षेत्रातील भारतातील दिग्गज कंपनी एसआयपी ॲकॅडमीने कामकाजाची २२ वर्षे पूर्ण करून आणि देशभरात १२५० हून अधिक फ्रँचायझी केंद्रांचा विस्तार करून नुकताच एक मोठा टप्पा पार केला. त्यामुळे ती भारतातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण नेटवर्कपैकी एक बनली आहे.


एसआयपी ॲबॅकस, ग्लोबलआर्ट, मायकिड्स आणि क्रिको इंग्लिश यांसारखे प्रमुख कार्यक्रम राबविणाऱ्या या ॲकॅडमीने जीआरटी हॉटेल्सच्या ग्रँड चेन्नई येथे भव्य प्रमाणात हा वर्धापनदिन साजरा केला. या कार्यक्रमात शीर्ष फ्रँचायझी, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि भागीदार सहभागी झाले होते. भारतातील १४ लाखांहून अधिक मुलांवर प्रभाव पाडणाऱ्या प्रवासाचा हे सर्व जण भाग आहेत.

यामध्ये इस्रोच्या रॉकेट प्रक्षेपणाचा भव्य पुरस्कार असलेली राष्ट्रीय स्तरावरील गणित स्पर्धा हा प्रमुख उपक्रम आहे. एसआयपीची प्रमुख अंकगणितीय जीनियस स्पर्धा (ॲरिथमेटिक जीनियस कॉन्टेस्ट –एजीसी) ची १० वी आवृत्ती ही केवळ एक स्पर्धा नाही. ती भारताच्या भविष्याचे एक अग्रस्थान आहे. या वर्षी राष्ट्रीय विजेत्यांना श्रीहरिकोटा येथे इस्रोच्या रॉकेट प्रक्षेपणाचे थेट प्रक्षेपण पाहण्याचा अविस्मरणीय अनुभव मिळणार आहे. त्यामुळे ते विज्ञान आणि अंतराळातील भारताच्या धाडसी कामगिरीचे प्रत्यक्ष साक्षीदार ठरतील.

भारताच्या अंतराळ आघाडीचा हा थेट अनुभव मुलांना देऊन एसआयपी ॲकॅडमी शैक्षणिक उत्कृष्टतेला पुरस्कृत करण्यापेक्षा आणखी बरेच काही करत आहे. ती कल्पनाशक्तीला चालना देत आहे, स्टेमच्या (एसटीईएम) स्वप्नांना चालना देत आहे आणि तरुण भारतीयांना देशाच्या वैज्ञानिक आकांक्षांच्या केंद्रस्थानी ठेवत आहे.

एसआयपी ॲकॅडमीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश व्हिक्टर म्हणाले, शॉर्टकटच्या मागे लागणाऱ्या या जगात, आम्ही प्रत्येक मुलामध्ये खरी कौशल्ये निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहिलो आहोत.

## सिद्धी संतोष झगडे यांनी जिंकला श्रावण क्वीन सेकंड रनर अप चा किताब





श्रावण महिना म्हणजे व्रत, वैकल्य,उपवास सण वाराचा महिना. या महिन्यात महिलांचे मंगळा गौरीचे विशेष व्रत असते.

मंगळागौर हे हिंदू धर्मातील एक व्रत आहे. ते श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी नवविवाहित महिलेने लग्नानंतर पहिली पाच वर्षे करावयाचे असते. यासाठी अशाच इतर नवविवाहितांनाही बोलावून सकाळी एकत्रित पूजा करतात व त्यानंतर रात्री जागरण करतात. यात विविध प्रकारचे खेळ खेळण्यात येतात.

दादासाहेब फाळके पुरस्कारासह सह अनेक सन्मानाचे पुरस्कार विजेत्या सौं. सुवर्णलता प्रकाश वांगे यांनी ५ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी २.००वाजता, शिवाजी मंदिर दादर मुंबई येथे श्रावण क्वीन स्पर्धा २०२५ चे आयोजन केले होते.स्पर्धेत मंगळागौरीत खेळल्या जाणाऱ्या खेळांचा समावेश होता. स्पर्धेचे परीक्षक म्हणून मिस इंडिया इंटरनेशनल विनर, मिस महाराष्ट्र कोमल रुपरेलिया, डान्स फॅशन आणि गरबा जुरी सिद्धेश जाधव यांनी काम पहिले. स्पर्धा प्रमुख म्हणून सुवर्णा भागवत यांनी तसेच वैशपायन गमरे, शेखर दाते, केदार वांगे, प्रशांत पवार यांनी व्यवस्थापनाचे काम पहिले.तन्वी बनसोडे यांच्या निवेदनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. महिलांसाठी दोन गटात या स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या. संपूर्ण महाराष्ट्रातून या स्पर्धेस महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला. अत्यंत प्रतिष्ठित अशा या स्पर्धेत चूरशीच्या लढतीत सिद्धी संतोष झगडे यांनी प्रचंड मेहनत घेऊन *सेकंड रनर अप* चे पारितोषिक मिळवले. याकरिता कु.सिद्धी संतोष झगडे यांना स्वर स्वामी कला साधना चे संचालक गणेश हातगे, प्रियांका हातगे, सौरभ हातगे, राजेश हुनारी यांचे फार मोलाचे सहकार्य लाभले.

# पिशोर ग्रामीण रुग्णालयाची जीर्ण इमारत बंद; वाढीव सुविधा असलेल्या रुग्णालयाची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नड- दि.११ ऑगस्ट – कन्नड तालुक्यातील पिशोर येथील ग्रामीण रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) असलेली इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत गेल्याने ती वापरण्यास अयोग्य ठरली आहे. बांधकाम विभागाच्या लेखी अहवालात हा इशारा देण्यात आल्यानंतर, रुग्णांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत हा विभाग तातडीने नवीन प्रसूतीगृहाच्या इमारतीत हलविण्यात आला.

वैद्यकीय अधीक्षक डॉ. धीरज पाटील यांनी सांगितले की, जीर्ण अवस्थेची माहिती वेळोवेळी वरिष्ठ अधिकारी आणि स्थानिक आमदार संजना जाधव यांना देण्यात आली होती. त्यानंतर जिल्हास्तरीय पाहणीदरम्यान इमारत धोकादायक असल्याचे स्पष्ट झाल्याने, पुढील अनर्थ अपघात टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.



नवीन प्रसूती विभागाच्या इमारतीत सध्या ओपीडी, तपासणी कक्ष आणि काही आवश्यक सेवा सुरू आहेत. मात्र, जागा कमी असल्याने आणि वाढत्या रुग्णभारामुळे या सेवांवर ताण येत आहे. पिशोरसह आसपासच्या १५ ते २० गावांतील शेकडो रुग्ण रोज उपचारासाठी येथे येतात. ग्रामीण भागातील अनेकांना मोठ्या शहरात उपचारासाठी जाणे शक्य नसल्याने हे रुग्णालयच त्यांचा मुख्य आधार आहे.

आमच्यासाठी हेच रुग्णालय आयुष्याचा आधार आहे. सुविधा वाढवल्या नाहीत तर एखाद्या गंभीर प्रसंगी मोठा प्रश्न निर्माण होईल. सरकारने तातडीने पावले उचलावीत.अशी प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे .

### वाढीव रुग्णालयाची मागणी

अनेक वर्षांपासून येथे वाढीव ५० खाटांचे, आधुनिक सुविधा असलेले रुग्णालय उभारावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आधुनिक तपासणी यंत्रणा, आपत्कालीन कक्ष, स्वतंत्र महिला व बालरोग विभाग, तसेच पर्याप्त वैद्यकीय मनुष्यबळाची गरज अधोरेखित करण्यात येत आहे. स्थानिकांच्या मते, ही मागणी पूर्ण झाल्यास केवळ पिशोरच नव्हे तर परिसरातील आरोग्य व्यवस्थेत मोठा बदल घडेल.

### पिशोर ग्रामीण रुग्णालयाची सद्यस्थिती

जीर्ण बाह्यरुग्ण विभाग इमारत बंद, नवीन प्रसूती विभागात ओपीडी सेवा सुरू, दररोज १५-२० गावांतील शेकडो रुग्णांची तपासणी, जागा आणि सुविधा अपुऱ्या, ५० खाटांचे आधुनिक रुग्णालयाची गरज तीव्र.

# सोयगाव तालुक्यात पावसाची दांडी, करपताहेत पिके

## रासायनिक खते व औषधांच्या खर्च वायाः शेतकरी हवालदिल

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ ऑगस्ट

सोयगाव सह तालुक्यात( २२ जुलै) पासून पावसाने खंड दिला आहे त्यामुळे सोयगाव तालुक्यातील ४२,६४५ हेक्टरवरील खरिपाच्या पिके तहानलेली आहे दरम्यान पावसाचा खंड आहे उन्हाची वाढती तीव्रता यामुळे पिकांवर ताण पडला आहे.मक्याची पिकं तुर्यावर आली असतांना पावसाची गरज आहे परंतु सोयगाव तालुक्यावर निसर्ग कोपला आहे. चारही महसूल मंडळात दुष्काळ सदृश स्थिति निर्माण झाली आहे. हंगामाच्या सुरुवातीला थोडाफार पाऊस पडल्याने शेतकऱ्यांनी वेळेच्या आत पिकाची लागवड केली आहे.परंतु आता मात्र पावसाने अचानक दडी मारल्याने जमीन कोरडी पडली असून जमिनीला भेगा पडल्या आहेत. या कोरडेपणामुळे पिके करपण्याच्या मार्गावर आली आहेत.



काही दिवसांपूर्वी पावसाने रिमझिम सुरुवात केली असताना अनेक शेतकऱ्यांनी कपाशी व मका लागवड केली. मात्र आता पाऊस अचानक गायब झाला आहे. त्यामुळे पिके सुकण्याची वेळ आली आहे. आकाशाकडे पाहून हात जोडण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे.

– ज्ञानेश्वर युवरे, शेतकरी घोसला.

सोयगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात कपाशीचे उत्पादन घेतले जाते.यंदा तालुक्यात २५,९४३ हेक्टर वर कपाशी ची लागवड असून ९,३७४ हेक्टरवर मक्याची लागवड आहे परंतु सध्या मक्याला मुबलक प्रमाणात पावसाची अत्यंत गरज आहे. पिकाला पाणी मिळाले नाही तर वाढ थांबून पिकावर कीड पडण्याचा धोका असतो. रोगराई पसरण्यास सुरुवात होते. अशीच परिस्थिती आता निर्माण झाली आहे. गेल्या १७ दिवसापासून पावसाने दडी मारली आहे. यामुळे कोरडवाहू आणि सिंचनावर अवलंबून असलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. विशेषतः सोयगाव, सावळदबारा आणि जरंडी या परिसरात मागील २० दिवसांपासून पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्याचा फटका या हंगामात बसण्याची शक्यता आहे.

भर पावसाळा सुरु असताना देखील मक्याची शेती अशी भेगाळली आहे. कपाशी तग धरून आहे आगामी तीन दिवसांत पाऊस न आल्यास कापूस पिकें देखील करपण्याच्या मार्गावर असल्याने उद्याची काळजी दाटली आहे.

### भर पावसाळ्यात शेतात पडल्या भेगा

पाण्याची सोय असणाऱ्या शेतकऱ्यांनी सुरुवातीला लागवड केली. पण दिवसेंदिवस वाढत्या उन्हासोबत शेतातील पाणी मोठ्या प्रमाणात जिरत आहे. त्यातच वेळेवर वीजपुरवठा मिळत नसल्याने सिंचनाची सोय असूनही जमिनीला भेगा पडल्या आहेत. पावसाळ्यात ही वेदनादायक स्थिती आहे.बहुतांश शेतकऱ्यांनी आतापर्यंत पीक सुरळीत वाढावे म्हणून भरपूर खर्च करून खत आणि रासायनिक औषधांची फवारणी केली आहे. सिंचनाची सोय असल्याने थोडाफार दिलासा असला तरी बहुतांश शेतकरी पावसावर पूर्णतः अवलंबून आहेत. शेतात पाणी नसल्याने फवारण्या केलेले औषधे आणि खते बिनकामी झाले आहेत.

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या नियोजनासाठी संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे बैठक संपन्न

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ ऑगस्ट


छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व तालुका क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या नियोजनासाठी विशेष बैठक नुकतीच संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे संपन्न झाली.या बैठकीस जिल्हा व तालुका पातळीवरील प्रमुख क्रीडा अधिकारी,क्रीडा शिक्षक,संयोजक आणि मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार होते.प्रमुख पाहुणे म्हणून तालुका क्रीडा अधिकारी मुकुंद वारकर,सचिन पुरी, खंडू यादवराव,गणेश पाळवंदे,तसेच तालुका क्रीडा संयोजक डॉ.निलेश गाडेकर उपस्थित होते.



या बैठकीत विविध क्रीडा स्पर्धांचे तांत्रिक प्रशिक्षण, नियमावली आणि नियोजन या बाबत सविस्तर चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.नियोजित १० तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये बुद्धिबळ, फुटबॉल, सॉफ्टबॉल, खो-खो, व्हॉलीबॉल, क्रिकेट, कबड्डी, योगासन, मैदानी स्पर्धा आणि कुस्ती (फ्रीस्टाईल व ग्रीको-रोमन) यांचा समावेश असून, त्यांच्या आयोजनासाठी तयारी सुरू असल्याचे सांगण्यात आले.क्रीडा अधिकारी मुकुंद वारकर यांनी उपस्थित शिक्षक व क्रीडा शिक्षकांना स्पर्धांचे यशस्वी आयोजन,विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग,स्पर्धांचे तांत्रिक अडथळे,नवीन नियम व शिस्तबद्धता याविषयी सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाप्रती उत्साह वाढविण्यासाठी शाळा व महाविद्यालयांनी सक्रीय भूमिका घेण्याचे आवाहन त्यांनी केले.प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात,सोयगाव येथील तालुका क्रीडा संकुलाचे रखडलेले काम लवकरात लवकर मार्गी लावावे,जेणेकरून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यांनी पुढे सांगितले की,ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार सुविधा दिल्यास त्यांच्यातील कौशल्य अधिक विकसित होऊ शकते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.निलेश गाडेकर यांनी केले तर प्रा.शेख तोफिक सर यांनी आभारप्रदर्शन केले.जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देशाई यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक यशस्वीपणे पार पडली. या बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.डॉ.निलेश गाडेकर, प्रा.तोफिक पठाण,नावेद शेख आणि सोहेल शिकलकर यांनी विशेष परिश्रम घेतले. ही बैठक तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी एक ठोस पाऊल ठरली असून, यामधून विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध होतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# सहकारी बँकांची भारतीय अर्थव्यवस्थेमधील भूमिका

आज जगामध्ये भारतीय बँकिंग व्यवस्था एक मजबूत बँकिंग व्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सुद्धा बँकांचा खूप महत्वाचा वाटा आहे. ग्रामीण शहरी भागांमध्ये सामान्य लोकांना सुद्धा बँकिंग सुविधा मिळत आहे. भारतामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या बँका आहेत. सरकारी बँका, खाजगी बँका, व्यापारी बँका, लघुवित्त बँका, पेमेंट बँका आणि सहकारी बँका, हे बँकांचे प्रकार त्यांची मालकी आणि कार्यपद्धती यानुसार करण्यात आले आहेत. हया सर्व प्रकारांमधील ज्या बँका रिझर्व्ह बँकेच्या काही अटी व शर्थी पूर्ण करतात त्यांना रिझर्व्ह बँक शेडयुल दोन मध्ये समाविष्ट करते. त्या बँकाना शेड्युल्ड बँक' असे संबोधले जाते



आज बँकिंग क्षेत्रामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकाप्रमाणेच 'सहकारी क्षेत्रातील बँकांचा सूद्धा बँकिंग सुविधा देण्यामध्ये मोठा वाटा आहे. विशेषता, ग्रामीण भाग, शहरी भागांमध्ये सामान्य लोकांना सर्व बँकिंग सुविधा व सर्वप्रकारची कर्ज सुद्धा देत आहोत. सहकारी बँकाच्या स्थापनेचा उद्देशच मुळात नफा कमाविणे नसुन सर्व प्रकारच्या लोकांच्या बँकिंग विषयक गरजा पूर्ण करणे हा आहे. सहकारी बँकामध्ये राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका, शहरी सहकारी बँका यांचा समावेश आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सहकारी बँका फार महत्वाची भूमिका निभावत आहे. ज्यामधे ग्रामीण आणि अर्थशहरी भागामध्ये लहान घटका पर्यंत बँकींग सुविधा देणे, शेती साठी अर्थसाहाय्य करणे , उद्योजक,व्यापारी, छोटे कारागीर यांच्या पण आर्थिक गरजा पुर्ण करण्याचे काम सहकारी बँका करत आहेत. ज्यामुळे खाजगी सावकारी किंवा विशिष्ट कंपन्या यांच्या जाचा पासून वाचत आहेत.

ग्रामीण अर्थव्यवस्था ऊर्जित करण्यामध्ये सहकारी बँका खूप महत्वाची भूमिका निभावत आहेत. सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र सहसा मर्यादित भागामध्ये असल्यामुळे त्यांना त्या भागातील लोकांच्या गरजा पूर्णपणे माहीत असतात. तसेच स्थानिक कर्मचारी असल्याने सर्वसामान्य लोकांशी तसेच ग्राहकांशी त्यांचे नाते आपलेपणाचे असते. ग्राहकांना त्यांच्या विषयी आपलेपणा मुळे खात्री असते. म्हणून त्यानुसार बंकांच्या योजना आणि सेवा पुरवल्या जातात. सहकारी बँका सर्व सदस्यांच्या मालकीमुळे सर्व सामान्यांना सुविधा पूरविण्याकडे जास्त कल असतो.

पत नसलेल्या व्यक्तीला आर्थिक पाठबळ देऊन सहकारी बँका त्या व्यक्तीला उभे करतात. सर्व सामान्यांना परवडणाऱ्या व सहज उपलब्ध होणाऱ्या सेवा सहकारी बँका देत असतात. व्यवसायामध्ये नफा कमावणे आवश्यक असले तरी सर्वसामान्य ग्राहकाला याचा त्रास होणार नाही ह्याची काळजीसहकारी बँकांमध्ये घेतली जाते.

बँकींग मध्ये होणाऱ्या नवीन बदलाप्रमाणे डिजीटल बँकींगचे वारे सहकारी बँकामध्ये वाहते आहे. सहकारी बँकामध्ये सुद्धा स्वत:चे ऐप,इंटरनेट बँकींग इत्यादी सुविधा ग्राहकांसाठी आणल्या जात आहेत. त्यामुळेच आज आपल्याला ग्रामीण भागामध्ये सुद्धा यूपीआय द्वारे किवा मोबाईल ऐप द्वारे बँकींग व्यवहार होताना दिसत आहेत. सहकारी बँका सुद्धा ग्राहकांना अपेक्षित असणा-या डिजिटल सुविधा उपलब्ध करून देत आहोत. त्यामुळे खऱ्या अर्थाने 'आर्थिक साक्षरतेची ज्या भागामध्ये गरज आहे त्या भागांमध्ये सहकारी बँका महत्वाची भूमिका बजवत आहेत.

**किशोर शितोळे**

(लेखक देवगिरी नागरी बँकेचे अध्यक्ष आहेत, या बँकेला नुकताच शेड्युल बँकेचा दर्जा मिळाला आहे )

## तांबव्याचा विष्णूबाळा रुपेरी पडद्यावर

छत्रपती संभाजीनगर – मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये अभिनेता सयाजी शिंदे यांनी चाहत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवले आहे. नुकतीच त्यांनी 'तांबव्याचा विष्णूबाळा' या चित्रपटाची घोषणा केली आहे.

सातारा जिल्ह्यातील डोंगराच्या कुशीत वसलेल्या तांबवे गावातील विष्णू बाळा पाटील यांच्या संघर्षाची कथा या चित्रपटातून उलगडणार आहे. सत्यघटनेवर आधारलेल्या, रक्तरंजित संघर्षाचा नायक असलेल्या विष्णूबाळाची मध्यवर्ती भूमिका सयाजी शिंदे साकारणार असून मराठी, हिंदी चित्रपटसृष्टीतील कलावंतांची मांदियाळी या भव्य चित्रपटातून आपल्या भेटीला येणार आहे. 'विश्वविनायक सिनेमॅटिक सफारी फिल्म एलएलपी प्रोडक्शन' बॅनरअंतर्गत येणाऱ्या 'तांबव्याचा विष्णूबाळा' या चित्रपटाचे लेखन अरविंद जगताप यांचे असून दिग्दर्शन अनुप जगदाळे करणार आहेत. या चित्रपटाचे निर्माते मनोहर जगताप आहेत. हा चित्रपट मराठीसोबत हिंदी, तेलुगू आणि तामिळ भाषेमध्ये प्रदर्शित होणार आहे.

२००१ साली 'तांबव्याचा विष्णूबाळा' हा मराठी चित्रपट आला

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जाक्र २०२५/संकीर्ण/जमृअ/सीआर-२५१/कावि-

दिनांक ११/०८/२०२५

## जाहीर प्रगटन (शुध्दीपत्रक)

अर्जदारः मनवर जावेदखाँ पठाण

विरुध्द

गैरअर्जदारः ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेंद्रा (कमंगर) ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज संदर्भः- श्री/श्रीमती. मनवर जावेदखों पठाण, रा. शेद्रा (कमंगर), ता. जि.छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज

दिनांक १७.०७.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चं सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे स्वतः नामे मनवर जावेदखों पठाणयांचा दिनांक ०३.०३.१९८८ रोजी राहते घरी, शेद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म नोंद जन्म नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे स्वतः नामे मनवर जावेदखों पठाण यांची जन्म नोंद नसल्याबावत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेंद्रा (कमंगर) ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे स्वतः नामे मनवर जावेदखों पठाण यांचा जन्म दिनांक ०३.०३.१९८८ रोजी राहते घरी, शेद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे स्वतः यांचे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत्/ तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/ तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक ११/०८/२०२५

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी. छत्रपती संभाजीनगर**

जाक्र २०२५/संकीर्ण/जमृअ/सीआर-२५०/कावि-

दिनांक ११/०८/२०२५

## जाहीर प्रगटन (शुध्दीपत्रक)

अर्जदार : अफसर जावेदखाँ पठाण

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेंद्रा (कमंगर) ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज संदर्भः- श्री/श्रीमती. अफसर जावेदखाँ पठाण, रा. शेद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक १७.०७.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे स्वतः नामे अफसर जावेदखाँ पठाणयांचा दिनांक १०.१०.१९९० रोजी राहते घरी. शेद्रा (कमंगर), ता. जि.छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म नोंद जन्म नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे स्वतः नामे अफसर जावेदखाँ पठाण यांची जन्म नोंद नसल्याबाबत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेंद्रा (कमंगर) ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे स्वतः नामे अफसर जावेदखाँ पठाण यांचा जन्म दिनांक १०.१०.१९९० रोजी राहते घरी. शेद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे स्वतः यांचे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक ११/०८/२०२५

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर.

उप विभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जाक्र २०२५/संकीर्ण/जमृअ/सीआर-२४९/कावि-

दिनांक ११/०८/२०२५

## जाहीर प्रगटन (शुध्दीपत्रक)

अर्जदारः अन्सार सरवरखाँ पठाण

विरुध्द

गैरअर्जदारः ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेंद्रा (कमंगर) ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विषयः- जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्ज

संदर्भः- श्री/श्रीमती. अन्सार सरवरखों पठाण, रा. शेंद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ज दिनांक १७.०७.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी ॲड. यांचेमार्फत या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २००० चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे स्वतः नामे अन्सार सरवरखाँ पठाणांचा दिनांक ०१.०६.१९८६ रोजी राहते घरी. शेद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून जन्म नोंद जन्म नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे.

अर्जदार यांचे स्वतः नामे अन्सार सरवरखों पठाण यांची जन्म नोंद नसल्याबाबत ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय शेंद्रा (कमंगर) ता. जि. छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे स्वतः नामे अन्सार सरवरखॉ पठाण यांचा जन्म दिनांक ०१.०६.१९८६ रोजी राहते घरी. शेंद्रा (कमंगर), ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला असून अर्जदार यांचे स्वतः यांचे जन्म प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत / तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/ हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपूर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करुन लेखी स्वरुपात नोंदवावा, मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे जन्म प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक ११/०८/२०२५

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर,

उप विभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर करीता

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अखेर संशयाचे भूत उतरविले

पहलगामच्या क्रूर घटनेने समाजमन सुन्न झाले. दहशतवादी धर्म विचारून हत्या करीत असतील तर त्यांची शिकवण कोणत्या वातावरणात झाली असेल आणि त्यांना शिकविणाऱ्यांची पातळी किती खालच्या दर्जाची असेल, हे उघड होते. पण, त्यांची हिंमत तर बघा, शंभर कोटींच्यावर हिंदूंची संख्या असलेल्या भारतात घुसून शेकडोंच्या संख्येने असलेल्या पर्यटकांपैकी केवळ हिंदू पुरुषांचीच ओळख पटवून त्यांच्यावर जवळून गोळ्या झाडण्यात आल्या. काश्मिरातील स्थानिक देशद्रोही आणि पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी मानवतेला काळिमा फासणारे कृत्य पहलगाममध्ये केले. त्याचे जे व्हायचे ते परिणाम घडून आलेच. देशात यापूर्वीही अनेक दहशतवादी हल्ले झालेत आणि हजारो निष्पाप नागरिकांचे बळी गेले. हिंदू मंदिरे, न्यायालय, गजबजलेले बाजार, उपनगरीय रेल्वे गाड्यांमध्ये स्फोट घडवून, ज्यांचा काहीच संबंध नव्हता, अशा नागरिकांना ठार मारण्यात आले. २६/११ चा मुंबईवरील हल्ला तर देशाच्या इतिहासातील सर्वांत मोठा आणि क्रूर दहशतवादी हल्ला होता. जवळपास तीन दिवस मुंबईला वेठीस धरण्यात आले होते. भारताच्या स्वाभिमानावर बसलेला घाव होता. पण, तत्कालीन काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने पाकिस्तानचा निषेध करण्यापलीकडे काहीच केले नाही. डोजिअरचा खेळ कित्येक दिवस चालला. भारताच्या गुप्तचर संस्थांना मुंबईत घुसलेले दहशतवादी पाकिस्तानातून आले होते याची माहिती असतानाही दिल्लीत षंढ आणि लढण्याची धमक नसलेले सरकार सत्तेवर असल्याने काहीच करता आले नाही.

काळाच्या ओघात मुंबईवरील हल्ला जनतेच्या स्मृतिपटलावरून पुसट व्हायला लागला. मुंबईवरील हल्ल्याचे मारेकरी पाकिस्तानात मोकाट सुटले आणि सातत्याने भारताविरोधात जिहादची भाषा वापरू लागले. पण, २०१४ नंतर परिस्थिती बदलू लागली. दिल्लीत भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्याने आता हल्ला घडविल्यास किंवा हल्लेखोरांना मदत केल्यास आपली खैर नाही, याची जाणीव अस्तनीत लपलेल्या विषारी सापांना झाली. त्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या गेल्या अकरा वर्षांच्या राजवटीत एकही दहशतवाही हल्ला घडवून आणण्याची हिंमत झाली नाही. या काळात जेवढे हल्ले झाले ते जम्मू-काश्मीरच्या आसपास झाले. पहलगाममध्ये २६ हिंदूंचे जीव घेणे एवढे महागात पडेल याची कल्पना ना दहशतवाद्यांनी केली असावी ना पाकिस्तानने. २२ एप्रिलच्या पहलगाम येथील घटनेनंतर हिंदूंना सातत्याने लक्ष्य करणाऱ्यांना जन्माची अद्दल घडविण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला. यासाठी प्रसंगी युद्धालाही सामोरे जाण्याच्या मानसिकतेत सरकार आले होते. सहा आणि सात मे दरम्यान भारताने व्याप्त काश्मीर आणि पाकिस्तानात घुसून दहशतवादी तळांवर भीषण हल्ले करीत ते नेस्तनाबूत केले. फाळणीनंतर इस्लामिक देश म्हणून मिरविणाऱ्या पाकिस्तानसाठी हा मोठा धक्का होता. आतापर्यंत केवळ पुराव्यांचे गठ्ठे पाठविणारा भारत थेट आतमध्ये घुसून हवाई हल्ले करू शकतो, यावर शाहबाज शरीफ सरकार, पाकिस्तानी जनता आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांचा विश्वासच बसत नव्हता. पण, हे घडले होते. जगात पाकिस्तानची इज्जत धुळीस मिळाली. या इस्लामिक देशाचे मानमर्दन झाले होते. पाकिस्तानी लष्कर बदला घेण्यासाठी तडफडायला लागले. लष्करप्रमुख आसिम मुनीर शांत बसणार नाही याची जाणीव असल्याने भारताने सीमेवर युद्धासाठीची सर्व तयारी ठेवली होती. सात मे च्या रात्री पाकिस्तानने हल्ले करण्यास प्रारंभ केला होता. सर्वांत भीषण संघर्ष आठ मे रोजीच्या रात्री उडाला. पाकिस्तानचे अत्याधुनिक रडारने सुसज्ज असलेले अवॅक्स विमान पंजाबच्या सीमेवर आले असता भारताच्या क्षेपणास्त्रांनी ते उडविले. सोबतच अमेरिकेने दिलेली तीन एफ-१६ आणि चिनी बनावटीची दोन जेएफ-१७ विमानेही भारताच्या आकाश आणि एस-४०० क्षेपणास्त्रांनी हवेतच नष्ट केली. ८ मे रोजी रात्री झालेल्या युद्धाचा थरार दुसऱ्या दिवशी प्रसार माध्यमांमधून जगाला कळला. यामध्ये अवॅक्ससह पाकिस्तानची सहा लढाऊ विमाने भारताने पाडल्याच्या बातम्या सर्वत्र होत्या. पण, वस्तुस्थिती कुणालाही माहीत नव्हती. विमाने पडल्याची कबुली पाकिस्तान तर देणारच नव्हता. कारण, यामुळे त्याची जगभरात नाचक्की झाली असती. भारतातही याबाबत अधिकृतपणे काहीही बोलले जात नव्हते. सरकार किंवा लष्कर अधिकृत माहिती देत नसल्याचा फायदा घेत विरोधकांनी सरकारला घेरणे सुरू केले. पाकिस्तानची किती विमाने पाडली याची आकडेवारी जाहीर करण्यासाठी मोदी सरकारवर दबाव आणला. प्रसंगी विदेशी प्रसार माध्यमांचीही मदत घेण्याचा नीचपणा विरोधकांनी केला. भारताची विमाने पडली नाही हे असे कसे होऊ शकते? असे प्रश्न काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांनी उपस्थित करणे सुरू केले. पण, मोदी सरकारने या विरोधकांना धुडकावून लावले.

पाकिस्तानची किती विमाने पाडली, याचे उत्तर अखेर हवाईदल प्रमुख अमरप्रीत सिंग यांनी शनिवारी बंगळुरू येथे आयोजित एका कार्यक्रमात दिले. भारताच्या संरक्षण दलांनी केलेल्या पराक्रमाचा लेखाजोखा त्यांनी सादर केला. सिंग यांनी याप्रसंगी वर्तमान सरकारच्या राजकीय इच्छाशक्तीचाही स्पष्टपणे उल्लेख केला. सरकारने लष्करी कारवाई करण्याचे अधिकार प्रदान केल्याने आम्हाला लक्ष्य निश्चित करता आले आणि जे आम्ही ठरविले होते ते साध्य केले. भारताला संघर्ष वाढवायचा नव्हता. पाकिस्तानचे संघर्षात जे काही नुकसान झाले त्याला तेथील सरकार आणि लष्कर जबाबदार आहे. आम्ही केवळ दहशतवादी तळांवर हल्ले केले, पाकिस्तानच्या नागरी वस्त्या अथवा लष्करी तळांवर नव्हे. पण शत्रूने आगळीक केली आणि अविचारीपणे हल्ले केले. परिणामी आम्हालाही प्रत्युत्तर द्यावे लागले. ८ मे रोजीच्या रात्री भारतीय हवाई संरक्षण प्रणालीने पाकिस्तानची पाच विमाने तर हवेतच नष्ट केली. यापैकी सर्वांत महागडे आणि हवाई हल्ल्याची पूर्वकल्पना देणारे अवॅक्स हे अत्याधुनिक विमान तर ३०० किलोमीटर अंतरावरून क्षेपणास्त्र डागून पाडल्याचे अमरप्रीत सिंग यांनी सांगितले. एवढ्या दूर अंतरावरून विमान भेदल्याचे जगातील हे पहिलेच प्रकरण असावे. पण, हवाईदल प्रमुखांनी एक खंतही व्यक्त केली. आपल्याच लोकांना आमच्यावर विश्वास नाही हे पाहून मनाला दु:ख होते. बालाकोटचा अनुभव आम्हाला आहे. बालाकोटच्या हवाई हल्ल्यात पाकिस्तानी दहशतवादी तळांचे मोठे नुकसान झाल्याचे आणि अनेक दहशतवादी ठार झाल्याची माहिती गुप्तचर संस्थांकडून आम्हाला मिळाली होती. पण, नेमके काय नुकसान झाले आणि किती दहशतवादी मारले गेले याचा अचूक आकडा काही लोकांनी मागितला. पण ऑपरेशन सिंदूरचे पुरावे जगासमोर आहेत. आजच्या युगात काहीही दीर्घकाळ लपून राहू शकत नाही. पाकिस्तानचे दीर्घकाळ लक्षात राहणारे नुकसान झाले आहे. चकलाला आणि मुरीद हे दोन शक्तिशाली कमांडो सेंटर्स होते पण भारताने ते नष्ट केले. एवढेच नव्हे तर त्यांची हवाई क्षमता नष्ट करताना कमीत कमी सहा रडार केंद्रे उडविण्यात आली. पाकिस्तानच्या मानहानीचे पुरावे उपलब्ध असल्याची सर्व माहिती हवाईदल प्रमुखांनी दिली. सुदैवाने आमच्या लष्करी तळांचे काहीही नुकसान झाले नाही. याचे सारे श्रेय आपल्या हवाई संरक्षण प्रणालीला द्यावे लागेल. कारण, पाकिस्तानने जर भारताच्या लष्करी तळांना लक्ष्य केले असते आणि काही नुकसान झाले असते तर शत्रूवर प्रचंड प्रहार करण्याचे आम्ही ठरविले होते, अशी माहिती हवाईदल प्रमुखांनी दिली. त्यामुळे विरोधकांनाही त्यांचे उत्तर मिळाले असेल. उरी आणि बालाकोटप्रमाणे पुरावे मागितले जाणार नाहीत. २०१९ मधील बालाकोटचे संशयाचे भूत यावेळी मात्र पूर्णपणे उतरविले आहे. पुरावे जगासमोर आहेत. उपग्रहांनी टिपलेली छायाचित्रे आहेत. त्यामुळे हवाईदल प्रमुखांनी बंगळुरू येथील कार्यक्रमात भारतीय सेनादलाच्या पराक्रमाचे जे वर्णन केले आहे त्यावरून यापुढे तरी विरोधकांनी पुरावे मागण्याच्या भानगडीत पडू नये, अशी अपेक्षा आहे. ■

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# ट्रम्प अमेरिकेचे गोर्बाचेव्ह ठरणार?

ग्लासनॉस्त आणि पेरिस्त्रायका! या दोन शब्दांनी बलाढ्य सोवियत युनियनचे विखंडन केले. आता ट्रेड आणि टेरिफ हे दोन शब्द बलाढ्य अमेरिकेचा घात करणार काय? राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या सहा महिन्यात घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेतल्यानंतर असा प्रश्न विचारला जात आहे. सोवियत युनियन ही जगातील एक महासत्ता होती. अनेक देश सोवियत युनियनच्या गोटात होते. पण, मिखाईल गोर्बाचेव्ह सोवियत युनियनचे राष्ट्रपती झाले. त्यांनी दोन शब्दांचा धडाका लावला. ग्लासनॉस्त आणि पेरिस्त्रायका. ग्लासनॉस्त म्हणजे खुलेपणा आणि पेरिस्त्रायका म्हणजे आर्थिक सुधारणा! सोवियत युनियनमध्ये नवे युग येणार, आर्थिक प्रगती झपाट्याने होणार असे सारे वातावरण देशात तयार झाले.

साऱ्या जगात गोर्बाचेव्ह यांचा उदोउदो सुरू झाला आणि याची परिणती झाली सोवियत युनियन व स्वत: गोर्बाचेव्ह यांच्या पतनात. सोवियत युनियनचे मित्र देश त्याला सोडून गेले. एवढेच नाही तर अनेक देश फुटून बाहेर पडले. युक्रेन, जॉर्जिया, अझरबेजान, तुर्कमेनिस्तान हे त्यातील काही देश. जगात सोवियत युनियन नावाचे प्रकरण इतिहासजमा झाले. स्वत: गोर्बाचेव्ह यांचेही पतन झाले. त्यांना अनेक वर्ष दुसऱ्या देशात आश्रय घ्यावा लागला.

**ट्रेड आणि टेरिफ** : राष्ट्रपती ट्रम्प आल्यानंतर ते काय काय करणार याची एक धास्ती होती आणि दुर्दैवाने ती खरी ठरू लागली आहे. मागील सहा महिन्यात ट्रम्प हे ट्रेड आणि टेरिफ या दोन शब्दांशिवाय काही बोलण्यास तयार नाहीत असे म्हणता येईल. यातच अमेरिका व स्वत: ट्रम्प यांचे पतन होईल काय असा प्रश्न आत्ताच विचारला जाऊ लागला आहे. त्यांची पहिल्या सहा महिन्यांची कारकीर्द साऱ्या जगाला धास्ती वाटावी अशी राहिली आहे. केवळ जगासाठी नाही तर अमेरिकेसाठीही ती धोकादायक ठरू लागली आहे असे ताज्या आकडेवारीवरून दिसते. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला धक्का बसत आहे. बेरोजगारी वाढत आहे, महागाई वाढत आहे आणि दुसरीकडे राष्ट्रपती ट्रम्प लोकसंख्या वाढविण्याचा सल्ला आपल्या नागरिकांना देत आहेत. वास्तविक त्यांना आपल्या देशातील परिस्थितीची कल्पना यावयास हवी होती. कारण, अमेरिकन राजकारणात- रेटिंग नावाची एक पद्धत आहे. यात एका ठरावीक कालांतराने राष्ट्रपतींच्या लोकप्रियतेचे मूल्यांकन केले जाते. ताज्या रेटिंगनुसार ट्रम्प यांची लोकप्रियता झपाट्याने घसरत आहे. पण, तरीही ट्रम्प यांना परिस्थितीची कल्पना आलेली नाही असे दिसते. उलट राष्ट्रपतिपदाला काळिमा फासणारे वर्तन ते करीत असून, यात आता सुधारणा होण्याची कोणतीही चिन्हे नाहीत.

**भारताची चिंता** : भारतासाठी सर्वांत चिंतेची बाब म्हणजे ट्रम्प यांनी पाकिस्तानला जवळ केले असून, भारतावर एकीकडे २५ टक्के आयात शुल्क लावण्याची घोषणा केली असताना, पाकिस्तानवरील आयात शुल्क मात्र २९ टक्क्यांवरून घटवून १९ टक्के केले आहे. भारतावरील आयात शुल्क काही दिवसांनी ५० टक्के करण्याची त्यांनी घोषणा केली आहे. म्हणजे सर्वच बाबतीत त्यांनी पाकिस्तानला प्राधान्य देणे सुरू केले आहे.

**भारताला धक्का** : राष्ट्रपती ट्रम्प यांनी लावलेल्या या आयात शुल्काचा भारतीय अर्थव्यवस्थेला धक्का बसेल असे मानले जाते. भारतातून केली जाणारी निर्यात कमी होईल. ज्या वस्तूंची निर्यात कमी होईल त्यांचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांमध्ये नोकरी कपात सुरू होईल. याने भारताचा जीडीपी २ टक्के कमी होईल असाही एक अंदाज व्यक्त केला जात आहे. यात भर म्हणजे अमेरिकेत शिक्षण घेत असलेल्या- नोकरीत असणाऱ्या युवकांवर अमेरिका सोडण्याची एक टांगती तलवार राहणार आहे.

**तेलाचा ताळेबंद** : भारत रशियाकडून स्वस्त दराने तेलाची आयात करीत आहे, याचा भारताला एका वर्षात ३४ हजार कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. पण, या कारणासाठी अमेरिकेने भारताविरोधात जी पावले उचलली आहेत त्यामुळे देशाला वर्षभरात ७ लाख ८३ हजार कोटींचा फटका बसणार आहे. यावरून स्वस्त तेलाचा सौदा भारताला कसा महागात पडत आहे याची कल्पना करता येईल.

**पाकिस्तानला बळ** : पाकिस्तानजवळ स्वत:चे काही नसताना त्याला अचानक बळ मिळत आहे. एकीकडे अमेरिका व दुसरीकडे चीन दोन्ही महासत्ता पाकिस्तानला सर्व प्रकारची मदत करीत आहेत. चीनने पाकिस्तानला अर्थपुरवठा चालविला आहे तर पाकिस्तानला अमेरिकेत जणू राजमान्यता मिळाली आहे. आंतरराष्ट्रीय जगतात पाकिस्तानला कधी नव्हते असे महत्त्व मिळत आहे. मधल्या काळात त्याला संयुक्त राष्ट्रात दहशतवादविरोधी समितीचे अध्यक्षपद मिळाले होते. दाऊद इब्राहिमने दहशतवाद विरोधी पथकाचे प्रमुख व्हावे असा हा प्रकार होता.

**युद्धबंदीतील भूमिका** : भारत-पाकिस्तान यांच्यात आपण युद्धबंदी घडवून आणली याचा ट्रम्प वारंवार उल्लेख करीत आहेत. विशेष म्हणजे यासाठी आपण 'ट्रेड डील'चा वापर केला असे ते सांगत आहेत. दुसरीकडे पाकिस्तान त्यांचा उदोउदो करीत आहे. पाकिस्तानने शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी त्यांच्या नावाची शिफारस केली आहे. याने तर ट्रम्प यांचा अहंकार जणू आभाळाला भिडला आहे. आता त्यांनी पाकिस्तानातील तेलसाठे विकसित करण्याचा मनोदय जाहीर केला आहे. युक्रेन, ग्रीनलॅण्ड यांच्याबाबतही त्यांनी काही खनिज साठे विकसित करण्याचा करार केला आहे. याने अमेरिका बळकट होईल असा त्यांचा विश्वास आहे, जो खुळा आहे असे आता दिसून येते.

**धक्का तंत्र** : मिखाईल गोर्बाचेव्ह आपल्या धोरणांचा उल्लेख 'शॉक थेरपी' - धक्का तंत्र असा करीत होते. याचा धक्का त्यांनाच केव्हा बसला हे त्यांनाही कळले नाही. तशीच अवस्था ट्रम्प यांची होण्याची चिन्हे आहेत.

**अराजकाकडे?** : राष्ट्रपती ट्रम्प अमेरिकन प्रशासन ज्या पद्धतीने चालवीत आहेत ती दिशा अराजकाकडे जाणारी आहे असे राजकीय निरीक्षकांना वाटत आहे. प्रत्येक महत्त्वाच्या संस्थेशी त्यांचा संघर्ष सुरू आहे. मग, ती अमेरिकेची रिझर्व्ह बँक असो वा एफबीआयसारखी महत्त्वाची सरकारी संस्था. प्रत्येकाशी ट्रम्प यांचा वाद सुरू आहे.

**आण्विक युद्धाची भीती** : राष्ट्रपती ट्रम्प यांचे ताजे कृत्य म्हणजे त्यांनी रशियाला शह देण्यासाठी आपल्या दोन आण्विक पाणबुड्या तैनात केल्या आहेत. याने रशियाही संतापला आहे. आता या दोघांमधील वाद जगाला आण्विक युद्धाच्या खाईत लोटेल काय अशी भीती तयार झाली आहे.

**ट्रम्प-पुतिन भेट** : युक्रेनच्या मुद्यावर राष्ट्रपती ट्रम्प व राष्ट्रपती पुतिन यांनी परस्परांना भेटण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्रपती पुतिन या युद्धाला कंटाळले आहेत. रशियाची अर्थव्यवस्था जर्जर झाली आहे. त्यांनाही युद्ध संपविण्याचा मार्ग हवा आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासोबत होत असलेली ही भेट त्यांच्यासाठी एक चांगली संधी आहे. पण, युक्रेनला पराभूत करण्याचा पुतिन यांचा उन्माद त्यांना तसे करू देईल काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. इस्रायलचे पंतप्रधान नेत्यानाहू यांनी आता गाझातील युद्ध थांबवावे असे काही देशांना वाटते. त्यांनी हे युद्ध न थांबविल्यास आम्ही स्वतंत्र पॅलेस्टिन देशाला मान्यता देऊ असा विचार या देशांनी सुरू केला आहे. असाच विचार युक्रेन युद्धाबाबत काही देश करू शकतात. भारतही करू शकतो. पुतिन याची दखल घेतील काय याचे उत्तर ट्रम्प-पुतिन भेटीनंतरच मिळू शकेल. ■

## वेध

पुंडलिक आंबटकर

# बदलत्या भारताची बदलती समीकरणे

भारताने शेकडो-हजारो वर्षे अन्याय-अत्याचार सहन केला. तेव्हाचा भारत संघटित नव्हता या एकाच कारणामुळे देशावर परकीयांनी राज्य करून अमाप लूट केली. समृद्ध असा सामाजिक, सांस्कृतिक वारसा नासवला. भारत उपखंडातील बहुतांश नागरिक मूळ हिंदूच आहेत. हे सर्व केवळ असंघटितपणा आणि विनाकामाची उदारता यामुळेच घडून आलेले आहे. परंतु, आधुनिक भारताचा नागरिक संघटित होऊ लागल्याने देशाने प्रत्येकच क्षेत्रात गगन भरारी घेतली आहे. कधीकाळी बैलगाडीवरून रॉकेट वाहून नेणाऱ्या भारताच्या आवाक्यात आता संपूर्ण सौरमंडळ आले आहे. भारताने विविध देशांचे तब्बल १०४ उपग्रह एकाचवेळी प्रक्षेपित करून इतिहास घडविला आहे. मंगळावर पहिल्याच प्रयत्नात यान पाठविणारा भारत एकमेव आहे. एक दशकापूर्वीपर्यंत शस्त्रास्त्रे आयात करणारा भारत एक प्रमुख देश होता. परंतु, भाजपा सरकार सत्तेत आल्यानंतर समीकरणे झपाट्याने बदलली. संरक्षण सामुग्री निर्यात करणारा एक प्रमुख देश म्हणून भारताने आपली ओळख निर्माण केली आहे. आज जवळपास ३२ देश भारताकडून शस्त्रास्त्रे खरेदी करण्यासाठी रांगेत आहेत. नेमकी हीच बाब अमेरिकेला खुपत आहे आणि त्यामुळेच भारतावर विविध प्रकारे निर्बंध लादण्याचा प्रयत्न सुरू आहे. भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादून अमेरिकेने भारताबद्दल असलेल्या आपल्या मनातील द्वेषाची पुनरावृत्ती केली आहे. यापूर्वीही या देशाने भारतावर अनेकदा आघात केलेला आहे. अमेरिकेला शस्त्रास्त्र स्पर्धेत नवा दावेदार नको आहे. कारण, शस्त्रास्त्रे विकूनच हा देश श्रीमंत बनला आहे.

वास्तविक अमेरिका प्रत्यक्ष युद्ध लढणाऱ्यांपैकी नाही. नेहमी इतरांच्या खांद्यावर बंदूक ठेवूनच या देशाने आपल्या अस्त्रांचे प्रदर्शन केलेले आहे. आता भारत शस्त्रास्त्र स्पर्धेत उतरल्याने अमेरिकेला मिरच्या झोंबल्या आहेत. परंतु, नव्या भारताची समीकरणेसुद्धा बदलली असून आता कोणी कितीही दबाव आणला तरी भारत डगमगणारा देश राहिलेला नाही. अमेरिका भारताकडून ४० टक्के औषधे खरेदी करतो. अशा परिस्थितीत ५० टक्के आयात शुल्क लादून ट्रम्प यांनी आपल्याच जनतेचा रोष ओढवून घेतला आहे. भारत कधीकाळी सोनियाची चिडिया म्हणून ओळखला जायचा. नंतरच्या काळात आपसी मतभेद आणि असंघटित समाजामुळे देश परकीयांच्या तावडीत गेला. तब्बल दीडशे वर्षे इंग्रजांनी राज्य केले. आज मात्र सर्वच बाबतीत इंग्लंड भारताच्या स्पर्धेतून बाद झाला आहे. इंग्लंड हा एक श्रीमंत देश म्हणून गणला जातो. कारण, त्यांची लोकसंख्या कमी असल्याने भारताच्या तुलनेत दरडोई उत्पन्न अधिक आहे. परंतु, एकूण संपत्ती व शक्तीचा विचार केला तर इंग्लंड भारतापुढे तग धरू शकत नाही. जेव्हा एखादी व्यक्ती, संघटना अथवा देश आपले उद्दिष्ट साधण्याच्या मार्गावर असतो तेव्हा असंतुष्ट वृत्ती त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न करतात. सध्या भारताला याच स्थितीतून जावे लागत आहे. नाटो आणि अमेरिकेसारखी महासत्ता भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे नवे पर्याय शोधूनच आपल्याला आपली वाटचाल कायम ठेवावी लागणार आहे. पाकिस्तानशी झालेल्या प्रत्येक युद्धात संपूर्ण जग भारताच्या विरोधात असताना केवळ रशिया आणि इस्रायल हे दोनच देश भारताच्या बाजूने होते. यहुदी लोकांवर भारताचे अनेक उपकार आहेत. त्यामुळे इस्रायलला भारताबद्दल सहानुभूती आहे.

रशियाने संकट काळात सदैव भारताची पाठराखण केलेली आहे. युक्रेन युद्धात भारताने रशियाला थेट पाठिंबा न देता कूटनीतिक मार्गाने तोडगा काढण्याचा प्रस्ताव वारंवार ठेवला. परंतु, कच्चे तेल खरेदी करून भारताने रशियाची आर्थिक बाजू सावरली. अनेक युरोपियन देशसुद्धा रशियाकडूनच तेल खरेदी करतात. मग भारतावरच रोष का? स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही भारताला अनेक हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. १९५० च्या दशकात अमेरिकेतून गव्हासोबत गाजर गवत अर्थातच काँग्रेसचे बीसुद्धा पाठविण्यात आले. याचा भारतासारख्या कृषिप्रधान देशाला मोठा फटका बसला. या गवतामुळे कृषी उत्पादनाचे प्रचंड नुकसान झाले आणि आजही होतच आहे. हे षडयंत्र नव्हते का? हा सर्व इतिहास ज्ञात असतानाही देशाचे विरोधी पक्षनेते ट्रम्प यांच्या सुरात सूर मिसळतात, ही बाब देशासाठी खूपच घातक आहे. ट्रम्प यांच्या व्यापारयुद्धामध्ये प्रतिस्पर्धी चीनसारखा देश भारताच्या बाजूने उतरला आहे. या प्रकरणात ब्राझीलसह २७ देशांनी भारताची बाजू घेतली आहे. यातून आधुनिक भारताचे सामर्थ्य सिद्ध होते. भविष्यातही अशी संकटे येणारच आहेत. त्यामुळे अशा संकटांवर मात करूनच आपल्याला आपले उद्दिष्ट गाठायचे आहे. ■

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर


# स्वातंत्र्य दिन चिरायु होवो

कवी ग. दि. माडगूळकर ज्यांना आपण 'गदिमा' म्हणून ओळखतो त्यांनी लिहिलेलं 'आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे' हे एक अजरामर गीत आहे. या गीताला नेहमीच १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशी गायिले जाते. ग. दि. माडगूळकर यांची आपल्या देशाप्रति आणि देशाच्या स्वातंत्र्याप्रति असलेली काव्यमय भावना त्यांनी या गीतामधून व्यक्त केलेली आहे. परंतु कवीची कल्पना ही जरी कितीही रम्य वाटत असली तरीसुद्धा 'स्वतंत्रता को सार्थक करने, शक्ति का आधार चाहिये' हे अतिशय महत्त्वाचे व लक्षात ठेवण्यासारखे आहे.

१५ ऑगस्ट १९४७ या दिवशी आपला देश स्वतंत्र झाला. ज्यावेळेस देश स्वतंत्र झाला त्यावेळेला भारताचे विभाजन होऊन तो खंडितही झाला व भारत मातेच्या अंगभंगातून पाकिस्तान नावाचे इस्लामी राष्ट्र जन्माला आले. पाकिस्तानातून भारतात येणाऱ्या हजारो लोकांना आपल्या अंगावरच्या वस्त्रानिशी, अत्यंत दीन, असहाय अवस्थेमध्ये आपल्या मुलाबाळांसह भारतामध्ये आश्रय घ्यावा लागला. त्यांना शरणार्थींचे जीवन जगावे लागले. पाकिस्तानातून भारतात येताना त्यांच्यावर अनन्वित अत्याचार झाले. महिलांवरील अत्याचाराची तर परिसीमा गाठली गेली. हजारो हिंदूंना ते केवळ हिंदू आहेत म्हणून ठार मारण्यात आले. मानवतेच्या इतिहासातील सगळ्यात मोठा भयंकर नरसंहार हा भारताला स्वातंत्र्याच्या भेटीच्या रूपाने मिळाला. म्हणजे स्वातंत्र्यासाठी एवढी मोठी किंमत आमच्या लाखो बांधवांनी दिलेली आहे. त्यामुळे १४ ऑगस्ट या दिवसाचे अखंड भारत दिवस म्हणून सुद्धा स्मरण केले पाहिजे.

खंडित का होईना भारताला स्वातंत्र्य मिळाले म्हणून अनेक क्रांतिकारक आनंदाने वेडे झाले. लोकांनी स्वातंत्र्याबद्दल आनंदाने मिठाई वाटली. परंतु ज्यांच्या बलिदानावर हे स्वातंत्र्य उभे राहिले होते असे अनेक ज्ञात आणि अज्ञात देशभक्त होते. त्यांनी त्यांच्या वर्तमानाला भारताच्या भविष्यासाठी छळ, यातना, तुरुंगवास, उपेक्षा यामध्ये गाडून टाकले होते.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारतामध्ये आनंदोत्सव सुरू झाला. आजही आपण १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनानिमित्त आपला आनंद साजरा करतो. परंतु याचाही विचार केला पाहिजे की केवळ आचंद्र सूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे असे म्हणून भारताचे स्वातंत्र्य आचंद्र सूर्य कायम राहणार नाही. तर या स्वातंत्र्याला त्यागाची, बलिदानाची भक्कम पाठराखण हवी असते. त्यासाठी तशा समाजाची आवश्यकता असते. असा समाज एकाएकी तयार होत नसतो. तर त्याला देशभक्तीच्या भावनेने अभिमंत्रित करण्याचे साधन लागते. १९२५ साली पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांचा उद्देश हिंदू समाजाचे संघटन व भारताचे स्वातंत्र्य हा होता. आज भारत स्वतंत्र आहे.



परंतु १९९१ मध्ये दत्तोपंत ठेंगडी म्हणाले होते की, १९४७ मध्ये आम्ही स्वतंत्र झालो परंतु आता आम्हाला आर्थिक स्वातंत्र्याची लढाई लढावी लागणार आहे. भारताने उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. जगाच्या विविध देशांमधून भारतामध्ये त्यांच्या वस्तू येऊ लागल्या. त्यांच्या चकचकीत आणि स्वस्त वस्तूंना भुललेला समाज आपले करोडो रुपये विदेशात पाठवू लागला. इंग्रज सुद्धा भारतातून कच्चा माल घेऊन जात होते आणि पक्का माल भारतात आणून विकत होते. हा भारताच्या आर्थिक गुलामगिरीचा मार्ग आहे. यासाठी जनतेमध्ये नेहमीच स्वदेशीसाठी जनजागरण करीत राहण्याची आवश्यकता आहे. आपल्या माननीय पंतप्रधानांनी 'व्होकल फॉर लोकल' हा संदेश दिलेला आहे. तोही आम्ही लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

सध्या सर्वत्र अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगभरातील ९० देशांवर लादलेल्या अतिरिक्त कराची चर्चा होत आहे. भारतावर सुद्धा त्यांनी ५० टक्के अतिरिक्त कर आकारलेला आहे. आपल्याला माहीत आहे की, अफगाणिस्तानातील तालिबान या दहशतवादी संघटनेला उभा करणारा अमेरिकाच आहे, तर पाकिस्तानला दहशतवाद्यांचे आश्रयस्थान बनविणारा सुद्धा अमेरिकाच आहे. भारताचा प्रभाव नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सर्व जगभर पडत आहे. वास्तविक पाहता अमेरिका भारताला करामध्ये सूट देऊ शकला असता तरीसुद्धा ट्रम्प यांच्या हट्टापायी त्यांनी तसे केले नाही. जगातील अनेक देशांनी ट्रम्प यांच्याकडे आमच्यावरील कर कमी करण्यात यावा अशी याचना केली. परंतु भारताने तशी मागणी केलेली नाही. भारताची युरोपियन युनियनमधील २७ देशांसोबत चर्चा सुरू आहे. मागील अकरा वर्षांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरातील विविध छोट्या मोठ्या देशांचा प्रवास केला व त्यांना भारतीय वस्तूंकरिता बाजारपेठ म्हणून तयार केलेले आहे. त्यामुळे अमेरिकेच्या भारतीय वस्तूंवरील अधिक कर आकारण्याच्या या निर्णयामुळे भारताला व्यापारातील नवीन मित्र तयार करण्याची संधी लाभलेली आहे. भारत सध्या तरी तरुणांचा देश आहे. जगाला आम्ही वस्तू आणि सेवा दोन्ही पुरवू शकतो. जगासाठी औषध, खाद्यान्न, वैद्यकीय सेवा तसेच जगातील मोठमोठ्या कंपन्यांसाठी भारतीय भूमी ही एक चांगले उत्पादन क्षेत्र ठरू शकते. येणाऱ्या काळामध्ये भारत हा एक मोठी अर्थव्यवस्था म्हणून जगामध्ये उदयास येणारच आहे. परंतु त्यासाठी जनतेने सुद्धा विदेशी मालांवर आपले जीवन अवलंबून राहू नये याचा निश्चय करणे आवश्यक आहे. जेवढे तुम्ही विदेशी वस्तूंवर अवलंबून राहाल तितके संधी येताच तुमचे हात पिळायला ट्रम्पसारखे लोक कमी करणार नाहीत. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने स्वदेशीचा संकल्प समाजाने घेण्याची आवश्यकता आहे.

नुकतेच ऑपरेशन सिंदूर झाले. त्या निमित्ताने संपूर्ण जगाला भारताची संरक्षण क्षमता दिसून आली. परंतु ही संरक्षण क्षमता एका दिवसात निर्माण करता येत नाही. मागील अकरा वर्षांपासून मोदी सरकार देशाला संरक्षणदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी कधी एस ४०० ही क्षेपणास्त्र विरोधी प्रणाली विकत घेत होते तर कधी राफेलसारखी अत्याधुनिक विमाने विकत घेत होते, कधी अग्निवीरसारखी योजना आणली गेली. ज्यामुळे देशाच्या तरुण रक्ताला काही काळ का होईना परंतु सैन्यामध्ये देशसेवा करण्याची संधी मिळावी. हे सर्व सरकारचे प्रयत्न होते. परंतु जनता सुद्धा या प्रयत्नामध्ये सहभागी झाली पाहिजे. समाजातल्या रूढी आणि कुरीती यांना बाहेरचा रस्ता दाखवत आता आधुनिक भारत हा एकसंध भारत आहे हे दाखवून देण्याची आवश्यकता आहे. जुन्या गोष्टी, कटू आठवणी आता बाजूला सारण्याची आवश्यकता आहे. जे होऊन गेले तो इतिहास आहे. आम्हाला नवीन भविष्य घडवायचे आहे. नवीन भारत घडवायचा आहे.

'येथे नसो निराशा थोड्या पराभवाने, पार्थास बोध केला येथेच माधवाने, हा देश स्तन्य प्याला, गीताख्य अमृताचे, आचंद्र सूर्य नांदो, स्वातंत्र्य भारताचे' हा संदेश लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### प्रथा आणि व्यथा

काळाप्रमाणे काही प्रथांमध्ये आजच्या काळात बदल घडविण्याची नक्कीच वेळ आली आहे. गौरी-गणपती असोत की अन्य सण पूर्वीच्या प्रथा आजच्या काळात जमवायच्या म्हणजे मनुष्यबळ आणि कुळाचारातील प्रथांचे मार्गदर्शन करणारी मंडळी फारशी उपलब्ध आणि प्रबळ राहिलेली नाहीत. अन्न जास्त झाले तर ते वाया जाते, अनेक भाज्या, अनेक पदार्थ स्वत: न शिकल्यामुळे पडेल त्या किमतीत घ्यावे लागतात; घरच्यासारखी चव नसली तरी. अन्न हे पूर्णब्रह्म आहे हा संतांचा मंत्र आचरणात का आणला जात नाही? देव भक्तीचा भुकेला आहे केवळ आपल्याला सर्व मिळावे म्हणून भगवंताच्या नावाने ते उपलब्ध करून त्याचा विनियोग केला जात नाही हेच मोठे दु:ख आहे. सणासुदीला अपेक्षित गप्पागोष्टींची मात्र रेलचेल बघायला मिळते. राग, अहंकार सोडून घालीन लोटांगण करण्यातच हित असते हे विसरता कामा नये. जे जे मनी वसे ते ते प्राप्त झाले तर जीवनाची गंमत आणि देवाची किंमत समजलीच नसती. आनंदाचा क्षण हाच मुहूर्त समजणे आणि ग्राह्य ठरविणे क्रमप्राप्त होते आहे. गर्वाचा आणि रागाचा त्याग करून दु:ख दूर करता येते हा सिद्धांत आम्ही कधी समजून घेणार? लोभ आणि अभिलाषेच्या जाळ्यात अडकून सुख मिळत नाही हे वास्तव तितकेच सत्य आहे. चारित्र्याच्या प्रशंसेने जीवन सफल होते परंतु त्यासाठी अविरत प्रयत्न करायला हवेत. आणि म्हणूनच प्रथा सांभाळताना व्यथित न होता त्यांचे संगोपन करा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

### दत्तावतार परमपूज्य वासुदेवानंद सरस्वती महाराज

वासुदेवानंद टेंबे स्वामी यांचा जन्म माणगाव या गावी झाला. वेदशास्त्र संपन्न हरी भटजी यांचे चिरंजीव गणेश भट व त्यांच्या पत्नी रमाबाई हे दाम्पत्य माणगावी राहत असत. गणेश भट हे गाणगापूरला त्यांचे आराध्य दैवत श्री गुरुदत्त यांची सेवा बारा वर्ष करत असताना एका शुभ दिनी त्यांना दत्ताचा साक्षात्कार झाला की आम्ही तुमच्या माणगावच्या घरी पुत्ररूपाने जन्मास येऊ. श्रावण कृष्ण पंचमी इ. स. १८५४ साली वासुदेवांचा जन्म जगाच्या उद्धारासाठी झाला. वडिलोपार्जित दत्त भक्तीचा वारसा वासुदेवानंदांकडे आला. माणगाव पावन क्षेत्र झाले. त्यांचे उपनयन आठव्या वर्षी होताच वेदशास्त्र संपन्न हरी भटजी आजोबाकडून त्यांनी वेदांचा अभ्यास, ज्योतिष शास्त्र, संस्कृतचे पठन केले. त्यांच्यावर दत्तकृपा असल्यामुळे दत्ताचे नामस्मरण सतत घेत. त्यांनी उज्जैन या पुण्यपावन स्थळी नारायणा नंद सरस्वतीकडून संन्यास दीक्षा घेतली. त्यानंतर वासुदेवानंद सरस्वती या नावाने ओळख होताच दत्तावतार म्हणून त्यांची ख्याती वाढली. त्यांनी चातुर्मासात अनेक स्थळी जाऊन दत्त मंदिरे निर्माण केली. त्यांचा २३ वा चातुर्मास गरुडेश्वरला झाला. स्वामींची नर्मदा मातेवर अपार श्रद्धा होती. मातेने कुमारिकेच्या रूपात अनेक वेळा त्यांना दर्शन दिले होते. त्यांच्या पदस्पर्शाने पद्मावती पवनी हे क्षेत्र पावन करून दत्त मंदिर उभारले. स्वामींनी जगाच्या कल्याणासाठी स्तोत्र, मंत्र, दत्त माहात्म्य अशी असंख्य स्तोत्रे, ग्रंथ लिहिले. आजही भक्तांना त्यांचा अनुभव येतो. आपण सर्व अंतर्मन शुद्ध करून गुरु दत्ताची प्रार्थना करूया. हे श्री गुरुदत्ता, आम्ही तुझे बालक आहोत. आमच्याकडून तुझे नामस्मरण कमी होत असेल तर भक्ती वाढवण्याचा आम्ही प्रयत्न करतो. मन एकाग्र स्थिर होण्यासाठी तुझ्या चरणी त्रिवार नमन. आमचे अंत:करण शुद्ध होण्यासाठी तुझी कृपादृष्टी सदैव आम्हावर असू दे. या १३ तारखेला श्रावण कृष्ण पंचमी म्हणजे त्यांची जयंती आहे. त्यादिवशी प्रार्थना करून पुष्पांजली वाहून स्वामींच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करूया.

**पल्लवी देशपांडे**/दुर्ग (छत्तीसगड)

●● ●●

### राष्ट्रध्वजाचा सन्मान : प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य

राष्ट्रध्वज हा आपल्या देशाच्या अस्मितेचे, अभिमानाचे आणि स्वाभिमानाचे प्रतीक आहे. १५ ऑगस्टला संपूर्ण देशभरात अत्यंत गौरवाने आणि अभिमानाने राष्ट्रध्वज फडकवला जातो. शूर स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग आणि बलिदानाचे स्मरण केले जाते. मात्र, दुर्दैवाची बाब अशी की, अनेक वेळा या दिवशीच राष्ट्रध्वजाचा अपमान होताना दिसतो. बाजारात सहज मिळणारे प्लॅस्टिकचे छोटे झेंडे रस्त्याच्या कडेला, कचऱ्यात किंवा पायाखाली तुडवलेले आढळून येतात. काही वेळा नृत्य, नाटक किंवा इतर कार्यक्रमांमध्ये राष्ट्रध्वजाचा अयोग्य वापर होतो. केकवर राष्ट्रध्वजाचे चित्र कापणे, चेहऱ्यावर राष्ट्रध्वजाचे चित्र रंगवणे, हा देखील त्याचा अपमान आहे. तसेच स्वातंत्र्य सैनिकांनी, क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाचा देखील अपमान आहे. तिरंग्याचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. तसेच सीमेवर तैनात असलेले सैनिक अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देशाचे रक्षण करतात. त्यांच्या त्यागामुळे आपण सुरक्षित आहोत, याचे भान प्रत्येक भारतीयाने ठेवले पाहिजे. राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राचा आत्मा. त्याचा सन्मान राखणे, त्याचा अपमान टाळणे आणि इतरांनाही याची जाणीव करून देणे हीच खरी देशभक्ती आहे. ■

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## समाजभूषण पुरस्कर्त्यांना दरमहा १५ हजार रुपये मानधन द्या

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.११ ऑगस्ट -**

वंचित, उपेक्षित व दलित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहिलेल्या समाजभूषण पुरस्कारप्राप्त व्यक्तींना दरमहा १५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, अशी मागणी समाजभूषण पुरस्कार प्राप्त संयोजन समितीच्यावतीने मुख्यमंत्र्यांना करण्यात आली.

या मागणीसाठी समितीच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनात नमूद केले आहे की, सामाजिक न्याय विभागामार्फत सन्मानित केलेल्या अनेक समाजभूषण पुरस्कारार्थी वृध्दापकाळात कोणत्याही उत्पन्नाशिवाय जगत आहेत. संपूर्ण आयुष्य सामाजिक कार्यात घालवल्यामुळे त्यांच्याकडे उपजीविकेचे साधन नाही, त्यामुळे शासनाने त्यांना दरमहा मानधन द्यावे. तसेच, सध्या या पुरस्कारप्राप्तांना साध्या बसमध्ये प्रवासाची मुभा आहे, मात्र शिवशाही आणि शिवाई एसटी बसमध्येही मोफत प्रवासाची परवानगी द्यावी, अशीही मागणी करण्यात आली. या शिष्टमंडळात शेषेराव करखेलीकर, लक्ष्मण तिकटे, श्रीहरी कांबळे, केशव कांबळे आदी पुरस्कारप्राप्तांचा समावेश होता.



## आ. पवारांच्या पुढाकाराने अपघातग्रस्त महिलेला मिळाला न्याय

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.११ ऑगस्ट -**

लातूर शहरातील महादेव नगर येथे तीन दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या संगीता गंगथडे या विवाहित महिलेला अखेर आमदार अभिमन्यू पवार यांच्या पुढाकाराने न्याय मिळाला आहे.



घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे उपचार खर्च भागवणे कठीण होत असताना, उजनीकरांनी आमदार पवारांची भेट घेऊन संपूर्ण वैद्यकीय खर्च आरोपीकडून वसूल करून देण्याची विनंती केली.

आमदार पवार यांनी केवळ उपचाराचा पूर्ण खर्च वसूल करण्याचे आश्वासनच दिले नाही, तर सह्याद्री हॉस्पिटल प्रशासनाला पीडितेच्या कुटुंबीयांकडून कोणताही खर्च न घेण्याच्या स्पष्ट सूचना केल्या.

घटनेत, डॉ. महेश पाटील यांनी एमएच २४ एएस ४२०४ क्रमांकाच्या चारचाकीने संगीता गंगथडे यांना धडक देऊन गंभीर जखमी केले होते.

अपघातानंतर आरोपीचे वडील मुरलीधर पाटील आणि नातेवाईक, जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता आहेत, यांनी उपचाराची पूर्ण जबाबदारी घेण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने पीडितेची प्रकृती दिवसेंदिवस बिघडत होती.

या पार्श्वभूमीवर ढवन कुटुंबीयांनी आमदार पवारांना भेटून न्यायाची मागणी केली.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समिती औसा चे योगीराज पाटील तसेच उजनी आणि कवळी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार पवारांच्या हस्तक्षेपामुळे आता पीडितेला उपचारासाठी आवश्यक मदत मिळणार असून, गावात याबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

## कंत्राटी सफाई कामगारांचा विविध मागण्यांसाठी बेमुदत संप सुरु



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.११ ऑगस्ट -**

नगर परिषद निलंगा येथे सफाई कर्मचारी म्हणून कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आजपासून (सोमवार, दि.११ ऑगस्ट) बेमुदत संपाला सुरुवात केली आहे. उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करत त्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

कामगारांनी वेतनवाढ आणि थकित वेतन तात्काळ देण्याची मागणी केली आहे. सध्या मिळणारे वेतन अत्यंत तुटपुंजे असून त्यामध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य असल्याचे ते म्हणाले. किमान वेतन १२,५०० रुपये करण्यात यावे, तसेच मार्च २०२५ ते ऑगस्ट २०२५ या सहा महिन्यांचे थकित वेतन तात्काळ अदा करण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

कामगारांचे म्हणणे आहे की, गुत्तेदाराकडे वेतनाबाबत विचारणा केल्यावर मुख्याधिकारी अनुपस्थित असल्याचे आणि टेंडरची मुदत संपल्याचे कारण सांगितले जाते. त्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ ओढवली आहे.

शासन व प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करून आमच्या मागण्या मान्य कराव्यात, अन्यथा संप मागे घेणार नसल्याचा इशारा कामगारांनी दिला आहे.

## निराधार मुलांना माणुसकीची सर्वोत्तम राखी



### सोशल टीमचा उपक्रम कौतुकास्पद...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.११ ऑगस्ट -**

सर्वोत्तम सोशल टीम लातूर यांनी प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी रक्षाबंधनाचा सण वंचित मुलांसोबत साजरा करून माणुसकीचा आदर्श निर्माण केला. माझं घर या ठिकाणी राहणाऱ्या निराधार मुलांना राखी बांधून, दहा कट्टे गहू देऊन व गोडधोड खाऊ घालून आनंदाचे क्षण वाटले.

गटशिक्षणाधिकारी सुरेश गायकवाड, शिक्षक नेते गायक पटेल, शिक्षक नेते दयानंद बिरादार, सोशल टीमचे उत्तम शेळके आणि माझं घरचे संचालक शरद झरे यांच्या उपस्थितीत हा उपक्रम पार पडला.

सोशल टीमच्या महिला विंगने निराधार मुलांना राखी बांधत प्रेम, आपुलकी आणि वैचारिक आधार दिला.पाच वर्षांपासून सोशल टीम वेगवेगळ्या ठिकाणी रक्षाबंधनाचा सण वंचित, गरजू आणि निराधारांमध्ये साजरा करत आहे. लातूर शहरात वर्षभर विविध कल्पक आणि समाजोपयोगी उपक्रम राबविणारी ही टीम सामाजिक कार्यात आघाडीवर आहे.

या उपक्रमासाठी रंजना चव्हाण, सिंधू जाधव, रंजना जगताप, सावित्री रायपल्ले, वर्षा कारले, सीमा देशमुख, जीवनकला महाराज, पुष्पा टीके, शोभा पाटील, वनमाला मसलकर, हिरा हेंडगे, ज्योती जगदाळे, उमादेवी ढेकरे, सविता पांढरे, सुदेशना पाटील, राजकुमार अग्रवाल, संजय पंचगले, सुरेश नागलगावे, प्रदीप ढेंकरे, प्रल्हाद ढवळे, अनंतवार विटागोड, सोमनाथ घटकर, सचिन सावळकर, कांबळे एस. जी., गोपीचंद बर्डे, हनमंत सरवडे, शिवाजी पांढरे, वेदप्रकाश भुसानुरे यांसह अनेकांनी विशेष प्रयत्न केले.

या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, माणुसकीचे रक्षाबंधन म्हणून या कार्याला विशेष ओळख मिळाली आहे.

## रक्षाबंधनात 'बंधुत्व' व 'कृतज्ञता'ची अनोखी जोड

### कळंबमध्ये भाजप महिला आघाडीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.११ ऑगस्ट -**

पोलीस म्हटले की, खाकी वर्दीत सदैव सज्ज असणारे रक्षक, जे अपवाद वगळता आपल्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र कर्तव्यावर असतात.

सण-उत्सव, आंदोलन, आपत्ती किंवा कोणतीही तातडीची परिस्थिती असो, पोलीस अधिकारी व कर्मचारी जीवाची पर्वा न करता आपले कर्तव्य बजावतात. या बांधवांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भारतीय जनता पार्टी महिला आघाडीच्या वतीने रक्षाबंधनाचा सण कळंब शहरात वेगळ्या पद्धतीने व सामाजिक बांधिलकीच्या भावनेने साजरा करण्यात आला.

जिल्हा सचिव वनिताराणी कटाळे आणि तालुका उपाध्यक्ष जान्हवी पत्की यांनी कळंब पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस बांधवांना राखी बांधली आणि गोडधोड देऊन सणाचा आनंद साजरा केला. यावेळी पोलीस निरीक्षक अजीत चिंतले, पोलीस उपनिरीक्षक पठाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक कांबळे यांच्यासह सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पोलीस बांधवांनी या उपक्रमाचा मनापासून आनंद व्यक्त केला.

रक्षाबंधनाच्या या अनोख्या उपक्रमामुळे पोलीस दल आणि नागरिक यांच्यातील स्नेह, विश्वास व आदराची भावना अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुटचा वर्धापन दिन वृक्षारोपणाने साजरा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.११ ऑगस्ट -**

तालुक्यातील आलमला येथील श्री विश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विश्वेश्वरय्या इन्स्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचा वर्धापन दिन विश्वेश्वर शैक्षणिक संकुलात वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे व सहसचिव महादेव खिचडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत धाराशिवे, उपप्राचार्य गोपाळ दंडिमे, विभागप्रमुख प्रविण साबदे, रेवणसिद्ध बुक्का, अंकुश बिडवे, मंगेश बिडवे, संदेश माडे, अब्दुल समद काझी, अजित लोकरे तसेच ब्ल्यु बर्ड ज्युनिअर सायन्स कॉलेजचे प्राचार्य योगेश माशाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

गेल्या १८ वर्षांपासून महाविद्यालयाने लातूर पॅटर्नच्या शैक्षणिक परंपरेत आपले वेगळेपण जपत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे एक्सलंट नामांकन, दोन वेळा मिळवलेले सर्वोच्च एन.बी.ए. मानांकन, विविध क्रीडा व तांत्रिक स्पर्धांतील प्रथम क्रमांकाची पारितोषिके, तसेच गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याचा उपक्रम ही महाविद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत.

महाविद्यालयाचा निकाल ९५ टक्क्यांपेक्षा जास्त ठेवण्यातही यश मिळवले आहे. उत्तीर्ण विद्यार्थी आज शासकीय, निमशासकीय तसेच राष्ट्रीय पातळीवरील नामांकित कंपन्यांमध्ये उच्च पदावर कार्यरत असून, सामाजिक क्षेत्रातही त्यांनी महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी भेटी देऊन मार्गदर्शन केले आहे, असे प्राचार्य प्रशांत धाराशिवे यांनी समारोपाच्या भाषणात सांगितले.

या वृक्षारोपण कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर क्रेडाईचा वृक्ष लागवड संदेश राज्यभर : जिल्हाधिकारी वर्षा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि.११ ऑगस्ट -**

लातूर क्रेडाईने वृक्ष लागवडीद्वारे राज्यभर एक नवा पॅटर्न निर्माण करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे. खोपेगाव येथील गणेशनगर परिसरात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते २ हजार वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मीना, महापालिका आयुक्त मानसी मीना, क्रेडाई महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रफुल्ल तावरे, सहसचिव सुरेश भोईटे, महापालिका उपायुक्त देवीदास जाधव, अप्पर जिल्हाधिकारी करमरकर, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी वृक्षारोपण करून उपक्रमाची सुरुवात झाली.

कार्यक्रमात क्रेडाई अध्यक्ष उदय पाटील यांनी उपक्रमाचे उद्दिष्ट व क्रेडाईच्या सामाजिक कार्यांचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी ठाकूर-घुगे यांनी लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवडीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे सांगून, जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने एक तरी झाड लावले पाहिजे, असे आवाहन केले. क्रेडाई ही सामाजिक भान जपणारी संस्था असून, प्रशासनही तिच्या पाठीशी ठामपणे उभे राहील, असे त्यांनी नमूद केले.

जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, सीईओ राजकुमार मीना, आयुक्त मानसी मीना यांनीही क्रेडाईच्या उपक्रमाचे कौतुक केले. प्रफुल्ल तावरे यांनी लातूर क्रेडाईचे काम राज्यभर राबविण्याची घोषणा केली आणि प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिल्यास वृक्षारोपण करण्याची तयारी दर्शविली.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार विष्णू मदने यांनी मानले.

## सद्गुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे ४१ वे श्रावणमास अनुष्ठान श्रीक्षेत्र कपिलधार येथे सुरू

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.११ ऑगस्ट -**

श्री शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूरचे मठाधीश ष.ब्र. १०८ तपोरत्न सद्गुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे ४१ वे श्रावणमास अनुष्ठान श्री मन्मथ मुक्तिधाम मठ, श्रीक्षेत्र कपिलधार येथे भक्तीमय वातावरणात सुरू असून, संगीतमय ईष्टलिंग रुद्रपुजेत चार राज्यांतील भाविकांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून येत आहे.

हे अनुष्ठान शुक्रवार, दि.२५ जुलै २०२५ रोजी प्रारंभ झाले असून, सांगता बुधवार, दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे.



या पावन पर्वकाळात दररोज पहाटे ५ ते ७ शिवपाठ, सकाळी ९ ते १२ शिवलिंग तोरणेकर यांच्या नेतृत्वाखाली संगीत रुद्र संचाचा संगीतमय रुद्रपाठ व सार्वजनिक ईष्टलिंग रुद्रपूजा, त्यानंतर प्रवचन, दर्शन सोहळा व महाप्रसाद, तसेच सायंकाळी ६ ते ७ भजन, ७ ते ८ गुरुवर्यांचे अमृत उपदेश व महाप्रसाद असा कार्यक्रम होत आहे.

आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि महाराष्ट्रातून महिला-पुरुष, अबालवृद्ध भक्त मोठ्या संख्येने सहभागी होत असून, शिवनामाच्या गजरात परिसर शिवमय झाला आहे. दररोज पूजा संपल्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचा लाभ दिला जात आहे.

रविवार, दि.१० ऑगस्ट रोजी झालेल्या ईष्टलिंग रुद्र महापुजेत उदगीर येथील औंकारेश्वर महादेव भजनी मंडळ, माजी नगरसेविका श्रीमती जगदेवी पोस्ते यांच्या नेतृत्वाखालील महिला भजनी मंडळ, तसेच उदयगिरी अर्बन बँकेचे चेअरमन दिगंबर बिरादार, सुरेश राजपाल, महादेव सोनटक्के, राम मोतीपवळे, चंद्रकांत बारोळे, कमठाने, गोकुळ तेलंगपुरे, शितल बिरादार, विजयलक्ष्मी सोनटक्के, संगीता मोतीपवळे, मल्लमा पटवारी, नागम्मा मुळे, शिलाताई धानूरे, पिंकू सलगरे, सरोजा कप्पिकिरे, संगीता तत्तापुरे, सिंधू डिगोळे, शिऊ पोस्ते, कमठाने, पाटिल आदींचा सहभाग होता.

आयोजकांनी सर्व भाविकांना या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## रुद्रेश्वर मंदिरात सतरा फुटी महादेव मूर्तीची भव्य प्राणप्रतिष्ठापना



**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि.११ ऑगस्ट -**

लातूरच्या एलआयसी कॉलनी येथील रुद्रेश्वर मंदिर प्रांगणात श्रावण मासाचे औचित्य साधत सोमवारी भक्तीमय वातावरणात सतरा फुटी भव्य महादेव मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. रुद्रेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या सोहळ्यात भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभागीय सरसंघचालक संजय अग्रवाल, शहर संघचालक उमाकांत मद्रेवार, माजी महापौर सुरेश पवार, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, काँग्रेस प्रभाग १८ अध्यक्ष सुंदर पाटील कव्हेकर, श्याम बलवतकर, महेश पाटील, गणेश कोलपाक, शोभा पाटील, श्वेता लोंढे, स्वाती घोरपडे, व्यंकटेश कुलकर्णी आदी उपस्थित होते.

मूर्तीकार अजय मुंदडा यांचा प्रतिष्ठानच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संजय अग्रवाल आणि सुरेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले, तर अध्यक्षीय समारोप माधवराव पाटील टाकळीकर यांनी केला.

सोहळ्याचे प्रास्ताविक मुख्य समन्वयक व माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी करताना आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. सूत्रसंचालन भालचंद्र येडवे पाटील यांनी केले, तर आभार शिवशंकर मळभागे व बनसोडे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशासाठी संजय एकशेट्टे, संजय धुम्मा, प्रदीप पाटील, शिवशंकर स्वामी, महादेवी बिराजदार, महेश करवंदे, मन्मथ बोळेगावे, शिवकुमार बिरादार, विनायक माने, अशोक घुमरे, महेश, राजू बिराजदार आदींनी परिश्रम घेतले. सोहळ्यास रुद्रेश्वर प्रतिष्ठानचे पदाधिकारी, परिसरातील भाविक तसेच महिला भक्तांची लक्षणीय उपस्थिती होती.

## 'दंत-वेदांता २०२५' परिषदेमुळे दंत शाखेतील नवकल्पना आणि तंत्रज्ञानात भर : डॉ. सुरेश कांगणे



**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि.११ ऑगस्ट -**

जीवनशैलीतील बदलांमुळे मुख-दंत रोगांचे प्रमाण वाढत असले तरी अत्याधुनिक उपचार पद्धती आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून यावर मात करणे शक्य आहे. गेल्या काही वर्षांत सौंदर्यविषयक दंतचिकित्सेत वेगाने तांत्रिक आणि वैज्ञानिक नवकल्पना होत आहेत. बदलत्या दंत शाखेच्या आयामांचा विचार करून 'दंत-वेदांता २०२५' ही राज्यस्तरीय पदवीपूर्व परिषद घेण्यात आली असून, या माध्यमातून दंत शाखेतील नवकल्पना आणि तंत्रज्ञानात अधिक भर पडेल, असा विश्वास एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे यांनी व्यक्त केला.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या वतीने आयोजित या एकदिवसीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्राचार्य डॉ. कांगणे बोलत होते. यावेळी एमएसडीसी निरीक्षक डॉ. गणेश कोटलवार, उपप्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी, कृत्रिम दंतरोपण तज्ज्ञ डॉ. सुशेन गांजरे, एण्डोडॉंटिक तज्ज्ञ डॉ. ऋषिकेश घुले आणि डॉ. अभिषेक बादाडे उपस्थित होते.

कला आणि विज्ञान यांचा संगम या थीमवर आधारित परिषदेत प्रमुख वक्त्यांची व्याख्याने, प्रत्यक्ष कार्यशाळा, पेपर व पोस्टर सादरीकरणे आणि परस्परसंवादी पॅनेल चर्चासत्रे झाली. एस्थेटिक दंतचिकित्सेद्वारे रुग्णाच्या हास्याचे स्वरूप आणि एकूण सौंदर्यशास्त्र सुधारण्यावर भर दिला जात असल्याचे डॉ. कांगणे यांनी नमूद केले.

कार्यशाळेत डॉ. सुशेन गांजरे यांनी सिरेमिक एस्थेटिक मॅक्सिमा, डॉ. ऋषिकेश घुले यांनी कंपोझिट व्हिनियर्स इंजेक्टेबल आणि प्रेडिक्टेबल पद्धत, तर डॉ. अभिषेक बादाडे यांनी व्हाईट एस्थेटिक लेसरद्वारे दात पांढरे करण्याची पद्धत यावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्नेहा गणमुखी आणि डॉ. स्वातीलक्ष्मी नायर यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. गौरी उगीले यांनी मानले. परिषदेसाठी राज्यभरातील दंत महाविद्यालयांचे विद्यार्थी, दंतचिकित्सक, प्राध्यापक, कर्मचारी आणि संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गुणवंत होऊन देश सेवेसाठी सज्ज व्हा - भास्करराव दानवे

तभा वृत्तसेवा
पारध /प्रतिनिधी

दिनांक ११ ऑगस्ट शालेय व महाविद्यालयीन जीवनामध्ये शिक्षण घेत असताना गुणवंत व्हा सुसंस्कारित होऊन देश सेवेसाठी सज्ज होण्याचे व मातृभूमीसाठी प्राण देण्याचे आव्हान भाजपा जिल्हा अध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी काल राजर्षी शाहू महाविद्यालय पारध आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात केले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक सचिव प्रो. सुखदेव मांटे यांनी गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा पुरविण्याचे आश्वासन यावेळी दिले. कार्यक्रमां साठी प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेच्या अध्यक्षा रेवती ताई मांटे, गायत्री मांटे, डॉक्टर शिवानी वाघ या उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुका सरचिटणीस श्री गोरे यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अमोल बांडगे तर महा विद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांच्या नावाच्या वाचन रवींद्र पान पाटील यांनी केले माध्यमिक विभागाचे वाचन ज्ञानेश्वर अल्हाट, विवेक पराड, विवेक अवसरमोल, स्वप्निल वाघ, निलेश लोखंडे यांनी केले आपल्या विभागाच्या वतीने विलास लोखंडे यांनी मनोगत व्यक्त केले तर महर्षी पारश्य ऋषी इंग्लिश स्कूलच्या वतीने प्राचार्या निलाशा लोखंडे, राजर्षी शाहू कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने प्रा. मंगेश लोखंडे यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अनिल मगर यांनी केले यावेळी गुणवंत विद्यार्थी पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.रामेश्वर पाडळे, प्रा. राजू शिंदे, प्रा मंगेश लोखंडे, प्रा. दिनेश कापरे, प्रा लक्ष्मण खरात, प्रा. लक्ष्मण सुसर कार्यालयीन अधिक्षक किशोर वाघ,



भागवत पानपाटील, राहुल सुरडकर, कृष्णा अल्हाट, तुकाराम लोखंडे, वैभव भोरकडे, संजय तबडे, कोळसे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वादग्रस्त मंत्र्यांच्या राजिनाम्यासाठी जालन्यात उबाठाचे लाक्षणिक धरणे आंदोलन

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने महायुती सरकारच्या कार्यकाळात सत्तेत असलेल्या वादग्रस्त मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत, या मागणीसाठी जालना शहरातील महात्मा गांधी चमन या ठिकाणी शिवसेनेच्या ( उबाठा गट ) वतीने एक दिवसीय लाक्षणिक धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये प्रामुख्याने माझ्या राज्याचा मंत्री हनी ट्रॅप मध्ये अडकतो, विधीमंडळात मंत्री रमी खेळतो, मंत्री अघोरी जादूटोणा करतो, मंत्री डान्स बार चालवतो, मंत्री नोटांच्या बॅगा घेऊन बसतो अश्या अशेयाचे बॅनर फ्लॅक्स लाक्षणीक उपोषण स्थळी लावत परिसरात घोषणांची अतिषबाजी करत परिसर दणाणून सोडला होता .



अशीही बनवाबनवी नावाचा चित्रपटाचे पोस्टर लावले. त्यामध्ये संजय नोटा वाले, रम्मीराव ढेकळे, योगेश डान्सबार वाले, गुलाबी महाजन आणि अघोरी जादू वाले यांच्या भुमिका असल्याचे दाखवण्यात आले आहे. चित्रपटाचे निर्माता, दिग्दर्शक, संवाद यासाठी मुख्यमंत्री फडणवीस दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची स्केच दाखवली आहे. यावेळी या ल एक दिवसीय लाक्षणिक उपोषण जिल्ह्याअध्यक्ष भास्करराव अंबेकर यांची प्रमुख उपस्थिती होती .

# तरुणांनो व्यसनमुक्त राहून आंनदीत जीवन जगा हभप शेलुदकर यांचा पारध येथे कीर्तनातून सल्ला

तभा वृत्तसेवा
पारध /प्रतिनिधी

हा काळ अतिशय खडतर असून प्रत्येकाने सावधगिरीने राहायला हवं. आणि तरुण पिढीने व्यसनापासून अलिप्त राहून आनंदी जीवन जगायला हवे. असा सल्ला ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांनी पारध बु. येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित कीर्तन महोत्सव प्रसंगी दिला.

भोकरदन तालुक्यातील पारध बु. येथे ३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट दरम्यान येथील महर्षी पराशर मंदिर सभागृहात युवा कीर्तनकार ह. भ. प. अंबादास महाराज लोखंडे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, श्रीमद भागवत कथा व कीर्तन महोत्सव सुरू असून या कीर्तन महोत्सवा दरम्यान शुक्रवार (दि.८) रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत व्यसनमुक्तीचे अजन्म प्रचारक, प्रसिध्द समाजप्रबोधनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन पार पडले. यावेळी ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली यांनी कीर्तनाला उपस्थित तरुण तरुणींची लक्षणीय उपस्थिती हेरून तरुणांना सल्ला देताना सांगितले की, ईश्वराच्या मार्गावर अग्रेसर रहा म्हणजे इतरत्र भटकण्याची वेळ येणार नाही त्यासाठी परमार्थाची कास धरली पाहिजे. तरुणींना सल्ला देताना ते म्हणाले की, आपल्या आई वडीलांनी आपल्यासाठी केलेल्या त्यागाचे स्मरण करत जा आणि समाजात त्यांची मान शरमेने झुकवावी लागेल असे कृत्य करू नका.

दरम्यान यावेळी माऊली महाराजांनी व्यसनमुक्तीसह विविध विषयांवर प्रकाश टाकला.या कीर्तनासाठी पारध आणि परिसरातील पारध खुर्द, लेहा, शेलुद, करजगाव, पद्मावती येथील शेकडो भाविक उपस्थित होते. तरुणांची लक्षणीय उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली. तरुणांनो व्यसनमुक्त राहून आंनदीत जीवन जगा हभप शेलुदकर यांचा पारध येथे कीर्तनातून सल्ला

पारध (प्रतिनिधी) : हा काळ अतिशय खडतर असून प्रत्येकाने सावधगिरीने राहायला हवं. आणि तरुण पिढीने व्यसनापासून अलिप्त राहून आनंदी जीवन जगायला हवे. असा सल्ला ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली शेलुदकर यांनी पारध बु. येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह निमित्त आयोजित कीर्तन महोत्सव प्रसंगी दिला.

भोकरदन तालुक्यातील पारध बु. येथे ३ ऑगस्ट ते १० ऑगस्ट दरम्यान येथील महर्षी पराशर मंदिर सभागृहात युवा कीर्तनकार ह. भ. प. अंबादास महाराज लोखंडे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, श्रीमद भागवत कथा व कीर्तन महोत्सव सुरू असून या कीर्तन महोत्सवा दरम्यान शुक्रवार (दि.८) रोजी रात्री ९ ते ११ या वेळेत व्यसनमुक्तीचे अजन्म प्रचारक, प्रसिध्द समाजप्रबोधनकार ह. भ. प. ज्ञानेश्वर



माऊली शेलुदकर यांचे समाजप्रबोधनपर कीर्तन पार पडले. यावेळी ह. भ. प. ज्ञानेश्वर माऊली यांनी कीर्तनाला उपस्थित तरुण तरुणींची लक्षणीय उपस्थिती हेरून तरुणांना सल्ला देताना सांगितले की, ईश्वराच्या मार्गावर अग्रेसर रहा म्हणजे इतरत्र भटकण्याची वेळ येणार नाही त्यासाठी परमार्थाची कास धरली पाहिजे. तरुणींना सल्ला देताना ते म्हणाले की,आपल्या आई वडीलांनी आपल्यासाठी केलेल्या त्यागाचे स्मरण करत जा आणि समाजात त्यांची मान शरमेने झुकवावी लागेल असे कृत्य करू नका.

दरम्यान यावेळी माऊली महाराजांनी व्यसनमुक्तीसह विविध विषयांवर प्रकाश टाकला. या कीर्तनासाठी पारध आणि परिसरातील पारध खुर्द, लेहा, शेलुद, करजगाव, पद्मावती येथील शेकडो भाविक उपस्थित होते. तरुणांची लक्षणीय उपस्थिती यावेळी पाहायला मिळाली.

# संक्षिप्त

## मंठा तहसीलदार यांच्यावर वाळू माफियांचा हल्ला अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांचा वाळू माफियाचा मंठा तालुक्यात धुमाकूळ

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा तहसीलदार यांच्यावर वाळू माफियांनी रविवारी रात्री दोन वाजता शिवीगाळ करत जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी व शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी मंठा पोलिसात तहसीलदार कल्याण काळदाते यांच्या फिर्यादी साबेर सिकंदर पठाण, अबरार लकीब सय्यद, शेख शफिक नजीर या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस सूत्रांकडून मिळाली माहिती अशी की, रविवारी रात्री वाळू माफिया विना क्रमांकाच्या पिकप वाहनामध्ये अवैधरीत्या रीती उपसा करून विनापरवाना बेकायदेशीररित्या वाळूची चोरटी वाहतूक करत होते. तहसीलदार यांना मिळालेल्या माहितीनुसार, त्यांनी सदर वाहनास थांबवून तपासणी करून विचारणा केली असता. वाळू माफियांनी ५० ते १०० जण बोलवून तहसीलदार यांच्यावर हल्ला केला त्यांच्या गाडीमागे व पुढे वाहने पळवत तहसीलदार काळदाते यांना धक्काबुक्की करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देऊन वाळुने भरलेला पिकअप पसार केला. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक मनोजकुमार राठोड हे करत आहेत.

## फायनान्स कंपनीच्या एंजटकडुन लाडक्या बहिनींचे शोषण

तभा वृत्तसेवा
अंबड / प्रतिनिधी

अंबड शहरातील अनेक महिला बचत गटातील महिलांनी कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी, व्यवसायासाठी, इतर कर्ज फेडण्यासाठी फायनान्स कंपनीकडून कर्ज घेतलेले असुन सदरील कर्ज वैयक्तिक स्वरूपात न घेता ते समुहात तसेच गटाच्या माध्यमातून घेतले जाते अनेक महिला कर्जाचा हप्ता वेळेवर भरु शकत नसल्याने फायनान्स कंपनीचे एजंट या महिलांच्या घरी चकरा मारुन हप्त्यासाठी तगादा लावतात फायनान्स कंपनीच्या जाळ्यात शहरातील शेकडो महिला अडकलेल्या असुन थकलेल्या कर्जाच्या हप्त्यासाठी त्यांचा फायनान्स कंपनी कडुन छळ केला जात आहे. समाजातील प्रतिष्ठा आणि अपमान यामुळे कुणीही याविरोधात आवाज उठवण्यासाठी पुढे येत नाही. बचत गटाच्या कर्जाचा हप्ता मासिक असतो मात्र फायनान्स कंपनीचा हप्ता आठवडा किंवा पंधरा दिवसाला असतो. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे उल्लंघन करुन अनेक फायनान्स कंपन्या शहरात ठाण मांडुन बसलेल्या असुन या फायनान्स कंपन्यांच्या एंजटकडुन महिलांचे शोषण व आर्थिक पिळवणूक होत आहे. फायनान्स कंपन्यांची पोलिसांनी तसेच लीड बँकेने झाडाझडती घेण्याची आवश्यकता असुन वसुलीच्या नावाखाली सुरू असलेले शोषण थांबवण्याची मागणी जोर धरीत आहे.

## जालना नांदेड समृद्धी महामार्ग व महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणी संदर्भात आज होणार बैठक – आ. अर्जुनराव खोतकर



तभा वृत्तसेवा
जालना/ प्रतिनिधी

जालना नांदेड समृद्धी महामार्गासाठी गेल्या शंभर दिवसापासून देवमूर्ती येथे आंदोलन सुरू आहे या आंदोलनासाठी व जालना शहराच्या महात्मा फुले मार्केट पुनर्बांधणी, जालना सिडको, शहरातील झोपडपट्टी धारकांना पि. आर. कार्ड देणे बाबत आमदार अर्जुन खोतकर यांनी तीन दिवसापूर्वी मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र काही कारणास्तव ही बैठक रद्द करण्यात आली होती. आता सदरील बैठक कॅबिनेटच्या दिवशी दिनांक १२/०८/२०२५ रोजी मंगळवारी दुपारी २.३० वाजता उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आ. अर्जुन खोतकर व सर्व संबंधित अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक मंत्रालय मुंबई आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला जालना नांदेड समृद्धी महामार्गाचे शेतकरी आंदोलक दिलीप राठी यासह शेतकरी व्यापारी उपस्थित राहणार आहे, यानंतर बैठक होणार नाही अशी माहिती आमदार अर्जुन खोतकर यांनी दिली आहे. यावेळी शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफुले, शिवसेना संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, दिनकर दादा घेवंदे उपस्थित होते.

# पिंपळगाव रेणुकाई येथे पौर्णिमेच्या निमित्ताने वृक्षारोपण; महिलांचा उत्स्फूर्त सहभाग



तभा वृत्तसेवा
पारध बु/प्रतिनीधी

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई .येथे पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर स्मशानभूमी येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. यात महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

या स्तुत्य उपक्रमासाठी गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि पदाधिकारी उपस्थित होते. यात सरपंच पंचफुला बोर्डे, ग्रामविकास अधिकारी एच.बी. साळवे, प्रा. अनिल मगर, तसेच संतोष बोर्डे, प्रकाश बोर्डे, प्रा. सदाशिव शैलेश बोर्डे, प्रकाश लोखंडे, समाधान बोर्डे, दिनेश बोर्डे, अमोल बोर्डे, सुभाष बोर्डे, आकाश बोर्डे, पंडित तातेराव बोर्डे, राहुल साळवे, राजेंद्र बोर्डे, आदित्य जगताप, रोशन बिरारे, आणि राहुल बोर्डे यांसारख्या पुरुषांनी उपस्थित राहून महिलांना प्रोत्साहन दिले.

यासोबतच शिलाबाई बोर्डे, मंगलाबाई बोर्डे, रुपाली बोर्डे, आशा बोर्डे, निर्मला बोर्डे, शालुबाई बोर्डे, जिजाबाई लोखंडे, कौसाबाई बोर्डे, उज्वलाबाई बोर्डे, अनिता बोर्डे, आणि सविता बोर्डे यांसारख्या महिलांनीही मोठ्या संख्येने भाग घेतला. गौतम बोर्डे, अक्षय बोर्डे आणि संघर्ष बोर्डे यांचीही उपस्थिती लक्षवेधी होती.

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन दिनेश बोर्डे आणि शैलेश बोर्डे यांनी केले. गावातील सर्व स्तरांतील नागरिकांनी एकत्र येऊन पर्यावरणासाठी केलेल्या या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# देवगावच्या संत सेवा नगर तांड्याला गावठाण विस्ताराची गरज व महसूल मंत्र्यांकडे विनोद मगरे यांनी केली मागणी



तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यातील देवगाव येथील संत सेवा नगर तांडा वस्तीसाठी गावठाण विस्ताराची मागणी जोर धरत आहे. याबाबत स्थानिक नागरिक विनोद मगरे, राज्याचे महसूल मंत्री मा. चंद्रकांत बावनकुळे यांना निवेदन देऊन तातडीने कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

संत सेवा नगर तांड्याला १९८५ मध्ये गट क्रमांक ९२ मधील गायरानातून केवळ २० आर जमीन गावठाणासाठी मंजूर करण्यात आली होती. मात्र, गेल्या काही दशकांत येथे लोकसंख्या झपाट्याने वाढली असून, नवीन घरे, रस्ते, वीज, पाणीपुरवठा आदी सुविधा विकसित झाल्या आहेत. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मंदिरे, मस्जिद, चर्च, बौद्ध विहार तसेच सामाजिक सभागृह यांसारखी सार्वजनिक बांधकामे देखील येथे उभी राहिली आहेत.

स्थानिकांच्या मते, विद्यमान गावठाण क्षेत्र अपुरे पडत असून वाढीव जागेची निकड निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने गावठाणाचा विस्तार तातडीने मंजूर करावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# बदनापूरमध्ये भीषण अपघात बसच्या चाकाखाली मोटारसायकलस्वार ठार

## राखी बांधण्यासाठी बहिणीकडे जात असताना दुर्दैवी मृत्यू

तभा वृत्तसेवा
बदनापूर / प्रतिनिधी

बदनापूर छत्रपती संभाजीनगरजालना महामार्गावर सोमवारी सकाळी घडलेल्या भीषण अपघातात मोटारसायकलस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही हृदय पिळवटून टाकणारी घटना बदनापूर पोलीस ठाण्यासमोर सकाळी अंदाजे ९ वाजता घडली.

मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव संजय सुंदराव चंदनपाट (वय ४८, रा. जडगाव, जि. छत्रपती संभाजीनगर) असे असून ते राखी पौर्णिमेनिमित्त जालना तालुक्यातील काळेगाव येथे राहणाऱ्या बहिणीकडे जात होते. मोटारसायकल (क्र. एम. एच. २० जि. टी. २६७४) वरून जात असताना बस (क्र. एम. एच. १४ एम. एच. १६७९) ने जोरदार धडक दिली. या धडकेनंतर ते बसच्या मागील चाकाखाली सापडले व जागीच ठार झाले.

अपघात एवढा भीषण होता की घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी काही क्षण डोळे मिटून घेतले. विशेष म्हणजे, या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हातगाड्या, रिक्षा आणि वाहने उभी राहिल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि अपघातांचा धोका वाढतो. काही महिन्यांपूर्वीही याच ठिकाणी अशाच प्रकारचा अपघात झाला होता.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक मछिंद्र सुरवसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड आणि सहाय्यक उपनिरीक्षक बाबासाहेब जऱ्हाड यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहावर कापड झाकण्यात आले आणि बस बाजूला घेण्यात आली. अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. पोलिसांनी तत्परतेने दुसऱ्या बाजूने वाहतूक सुरू करून अडथळा दूर केला.



मृतदेह खासगी वाहनाद्वारे शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# हिंगोलीत उबाठा शिवसेनेचे जनआक्रोश आंदोलन

## भ्रष्ट मंत्र्यांचे राजीनामे घेण्याची मागणी, प्रतिकात्मक होम हवन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ ऑगस्ट**

राज्य सरकारमधील भ्रष्ट आणि वादग्रस्त मंत्र्यांचे तातडीने राजीनामे घ्या या मागणीसह इतर मागण्यांसाठी उबाठा शिवसेनेच्यावतीने प्रतिकात्मक होमहवन पूजा करून राज्य सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत जन आक्रोश आंदोलन करण्यात आले.

येथील महात्मा गांधी चौकात उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील यांच्या नेतृत्वात सोमवारी जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. दुपारी बारा ते दोन या वेळात येथील गांधी चौकात प्रतिकात्मक होमहवन पूजा मांडून राज्य सरकारमधील भ्रष्ट मंत्री तसेच वादग्रस्त मंत्री यांचे राजीनामे घेण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील यांनी राज्य सरकारवर सडकून टिका केली. विधानसभेच्या पवित्र ठिकाणी राज्याचा मंत्री मोबाईलवर रम्मी खेळतो हे चुकीचे आहे. यावरून त्यांना शेतकरी, जनता यांची किती काळजी आहे हे लक्षात येते. एक मंत्री हातात सिगारेट घेऊन समोर पैशाची बॅग ठेवतो तर एक भोजन निकृष्ट दर्जाचे दिल्याच्या कारणावरून कॅन्टीनच्या कर्मचाऱ्याला मारहाण करतो तर कोणी मंत्रीपद मिळावे म्हणून होमहवन करतो, अघोरी पूजा करतो हे योग्य नाही. शासनाने या मंत्र्यांचे तत्काळ राजीनामे घ्यावेत तसेच जनतेच्या हिताचे निर्णय घ्यावेत. शासनाने या भ्रष्ट आणि वादग्रस्त मंत्र्यांचे राजीनामे न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी जिल्हाप्रमुख गोपू पाटील यांनी दिला.

या आंदोलनात माजी आ. डॉ संतोष टारफे, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, उध्ववराव गायकवाड, माजी सभापती रूपालीताई गोरेगावकर, परमेश्वर मांडगे, गणेश शिंदे, गणेश देशमुख, विठ्ठल चौतमल, बाळासाहेब मगर, आनंदराव जगताप, चंदू उबाळे, बालाजी कर्डीले आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी प्रशासनाचा स्तुत्य उपक्रम

## मुलींना प्रशासनातील अधिकारीपदाची जबाबदारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ ऑगस्ट**

जिल्ह्याचा मुलींचा जन्मदर वाढावा तसेच जनजागृती व्हावी तसेच मुली मुलांएवढ्याच सक्षम आहेत हे दाखविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील आठ मुलींची निवड करण्यात आली असून त्यांना प्रशासनातील जिल्हाधिकारी पासून ते विविध अधिकारी पदाची जबाबदारी देत अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये त्या पदाचे एक दिवस कामकाज चालविण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा स्तुत्य उपक्रम जिल्हा प्रशासनाच्यावतीने राबविण्यात येत आहे.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांच्या उपस्थितीत ग्रामीण भागातील एका विद्यार्थींनीला सोमवारी जिल्हाधिकारी पदाचा एक दिवसाचा कार्यभार सोपवला. यावेळी विद्यार्थीनीने मोठ्या जबाबदारीने हा पदभार स्विकारत जिल्हाधिकारी यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्य तसेच त्यांच्या कामकाजाचा अनुभव घेतला. भेटीसाठी येणाऱ्या लोकांच्या तक्रारी, समस्या जाणून घेवून त्या सोडविण्याचा प्रयत्नही यावेळी या विद्यार्थीनीने केला. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांची उपस्थिती होती.

यासंदर्भात माहीती देतांना राहुल गुप्ता म्हणाले की, जिल्ह्याचा मुलींचा जन्मदर सध्या ९१० आहे. तो वाढविण्यासाठी तसेच लोकांमध्ये जनजागृंती निर्माण करण्यासाठी हा उपक्रम आम्ही हाती घेतला असून जिल्हा प्रशासनातील विविध पदांवर मुलींना जबाबदारी सोपवून त्यांना कामकाजाबद्दल अवगत करणार आहोत. त्यामुळे समाजात मुलींचे महत्व नक्कीच समजेल आणि मुलींचा जन्मदरात वाढ होईल.

यावेळी अंजली रमेश यांनी सांगितले की, यामुळे मुलींमध्ये आत्मविश्वास वाढेल, त्यांना शिक्षणाची आवड निर्माण होईल. समाजातही मुलींबद्दल जागरूकता निर्माण होईल.

# अजित पवारांच्या वाढदिवसानिमित्त खांडेगाव येथे महाआरोग्य शिबीर



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ११ ऑगस्ट**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार राजू नवघरे यांच्या संकल्पनेतून वसमत विधानसभा मतदारसंघातील खांडेगाव (सर्कल, ता. वसमत) येथे आज एक भव्यदिव्य महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार नवघरे यांचे हस्ते करण्यात आले.

अजित दादा पवार यांच्या वाढदिवसाचे निमित्ताने मतदार संघात विविध ठिकाणी हे शिबिर घेत असून या आरोग्य शिबिरात नागरिकांना आरोग्य तपासणी पासून ते शासकीय पर्यंत सर्व काही मोफत मिळत आहे. या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी थेट जनतेच्या सेवेसाठी कार्यरत आहेत. मोफत सर्व प्रकारच्या तपासण्या-रक्तदाब, मधुमेह, हृदय तपासणी, डोळे तपासणी, महिलांचे आरोग्य, बालरोग तपासणी, मोफत औषध वितरण - त्वरित उपचार व सल्ला. विशेष सुविधा-गंभीर आजारांसाठी पुढील उपचाराची व्यवस्था व रेफरल सुविधा शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत गर्दी केली होती. आजूबाजूच्या गावांतील लोकही आरोग्य सेवेचा लाभ घेण्यासाठी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. आयोजकांच्या म्हणण्यानुसार, आमदार राजू भैय्या नवघरे यांच्या सामाजिक कार्य, विकासाचा ध्यास आणि जनसेवा भावनेतूनच या महाआरोग्य शिबिराचा संकल्प साकार झाला आहे. खांडेगाव सर्कल खऱ्या अर्थाने आरोग्य महोत्सवाचे केंद्र बनले असून, या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये आनंद आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रम प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी खांडेगाव सर्कल मधील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- अमरावती जिल्ह्यात पदाचा दुरूपयोग करून कंत्राटी कर्मचारी यांचा छळ व मानसिक त्रास देणाऱ्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा तसेच त्यांची न्यायालयीन चौकशी करावी अशी मागणी हिंगोली येथील उमेदच्या कर्मचाऱ्यांनी करीत जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले. यावेळी काळ्या फिती लावून निषेधही केला. छाया- विजय गुंडेकर**


## संक्षिप्त वृत्त

### सेवानिवृत्ती निमित्त शैलेश मुदीराज यांचा सत्कार



हिंगोली- हिंगोली येथील प्रसिद्ध व्यंकटेश नेत्रालय अँड रेटीना केअर सेंटर येथे हिंगोली पोलीस विभागातील,महामार्ग पोलीस विभागातील पोलीस उपनिरीक्षक श्री शैलेश मुदिराज यांचा सेवानिवृत्ती बद्दल सत्कार करण्यात आला. हिंगोली पोलीस दलातील उत्कृष्ट सेवा बजावणारे पोलीस अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. यावेळी व्यंकटेश नेत्रालय अँड रेटीना केअर सेंटर संचालक डाँ किशन द. लखमावार, रेटीनातज्ञ् डाँ. प्रतीक किशन लखमावार, प्रा. विक्रम जावळे, मुळे, डाँ प्रल्हाद शिंदे, शैलेश साकळे, विठ्ठल डोके, सुरज वाघमोडे, अनिल घुगे, विशाल गडदे, विशाल इंगोले, देविदास धनवे, शुभम खंदारे, प्रवीण घुगे हे उपस्थित होते.

### सांदीपनीमध्ये पोलिस प्रशासनाकडून मार्गदर्शन



हिंगोली- मिशन निर्भया व मिशन समाधान अंतर्गत सांदीपनी पब्लिक स्कूल नांदेड या ठिकाणी स.पो.नि दयानंद पाटील पोलीस उप निरीक्षक मारुती चव्हाण, काशिनाथ कारखेडे यांच्या सह भेट देण्यात आली. सदर कार्यक्रमास मुख्याध्यापिका सौ क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ हरप्रीत कौर, प्रशासक मारोती मेखाले, समन्वय सल्लागार केदार शर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती. इतर शिक्षक वृंद शाळेचे एकूण ६०० विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी पोलिस प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना सायबर क्राईम, अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम, रस्ते सुरक्षा, महिला व बाल सुरक्षा, इतर विषयाच्या अनुषंगाने सखोल मार्गदर्शन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले व आभार प्रदर्शन मारोती मेखाले यांनी केली

### ३२ अवैध दारू विक्री अड्डयावर छापे

हिंगोली- हिंगोली पोलिस दलाच्यावतीने रविवारी ३२ ठिकाणी अवैधदारू विक्री करणाऱ्यावर छापे टाकण्यात आले. आरोपीतांकडून ४१ हजार १४० रूपयांचा मुद्देमाल जप्त करीत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच एका जुगार अड्डयावर धाड टाकण्यात आली.

# हिंगोली नगर परिषदेच्यावतीने शहरातून तिरंगा रॅली, अधिकारी, कर्मचारी सहभागी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ११ ऑगस्ट**

हिंगोली नगरपरिषदेच्या वतीने हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन दि ११ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या रॅलीत अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भारत सरकारने राष्ट्रीय अंमलबजावणी समितीने मंजूर केल्या नुसार दिनांक ०२ ते १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत देशभरात हर घर तिरंगा २०२५ हि मोहीम तीन टप्यात साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने हिंगोली नगरपरिषदेच्या वतीने प्रभारी मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर मार्गदर्शनाखाली हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीला हिरवी झेंडी दाखवून हिंगोली नगरपरिषद प्रशासकीय इमारत येथून तिरंगा रॅली काढण्यात आली यावेळी नगरपरिषदचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान तिरंगा ध्वज हा नागरिकांनी आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवायचा आहे. त्या अनुषंगाने ही तिरंगा रॅली न.प इमारत मार्गे अग्रसेन चौक, इंदिरा गांधी चौक, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे न.प. इमारत याठिकाणी तिरंगा रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी उपमुख्याधिकारी श्याम माळवटकर, नगर अभियंता प्रतिक नाईक, नगर रचनाकार प्रवीण मोहेकर, स्वच्छता निरिक्षक बाळू भाऊ बांगर,आकाश देशमुख, .सचिन पवार, एस.आर.भुरके, रामेश्वर चाटे, गोविंद चव्हाण, संजय दोडल, देविसिंग ठाकूर, संदीप घुगे, शिवाजी घुगे, प्रवीण चव्हाण, पंडित मस्के, गणेश धनगर, विनय साहू, अशोक गवळी, बी.टी. काळे, एजाज पठाण, विजय रामेश्वरे, नितीन पहिनकर, दिनकर शिंदे, मनोज बुरसे, अशोक आठवले, उमेश वर्मा, शेख साजिद, अथर्व वर्मा, वर्धमान सोनटक्के, रवी गायकवाड, अजय मंडले, आकाश गायकवाड, रवि जोंधळे, कुणाल कांबळे, गणेश गायकवाड, मनीष दराडे यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी, कर्मचारी व नागरिक सहभागी झाले होते.

# हिंगोलीत आज शेतकऱ्यांचा आसुड मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ ऑगस्ट**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात आज दि १२ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांचा आसुड मोर्चा काढण्यात येणार आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीसह पिकवीमा, शेतीमालाला हमीभाव द्या तसेच शेतकरी आत्महत्या तसेच नागरिकांच्या इतर प्रश्नांवर आज दि १२ ऑगस्ट रोजी शेतकरी नेते रविकांत तुपकर हे हिंगोलीत येणार असून त्यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी आसूड मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणार आहे. हा मोर्चा सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पूतळ्यापासून निघणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे दर्शन केल्यानंतर रविकांत तुपकर हे मोर्चाला सुरूवात करणार असून हा मोर्चा शहरातील पिपल्स बँक, भाजीमंडई, पेट्रोलपंप, गांधी चौक, इंदिरा गांधी चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात येणार आहे. मोर्चात शेतकरी, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन गजानन कावरखे, नामदेव पतंगे आदींनी केले आहे.

या मोर्चाच्या बंदोबस्तासाठी पोलिस दलाने तगडा बंदोबस्त लावला असून मागील वेळी रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात मोर्चाला प्रचंड प्रतिसाद होता.

# शासकीय योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यात चित्रप्रदर्शनीचे योगदान- तहसीलदार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ ऑगस्ट**

येथील नागनाथ मंदिर परिसरातील भक्त निवास क्र. २ येथे आयोजित प्रदर्शनात शासकीय योजना तळागाळात पोहचविण्यासाठी केंद्र शासनाच्या मल्टीमीडिया चित्रप्रदर्शनीचे मोलाचे योगदान ठरत आहे असे औंढा येथील तहसीलदार हरीश गाडे यांनी प्रतिपादन केले.

केंद्र सरकारच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या नांदेड येथील केंद्रीय संचार ब्यूरोच्यावतीने आयोजित केंद्र सरकारची ११ वर्षे-सेवा सुशासन आणि गरीब कल्याणाची, हर घर तिरंगा, आजादी का अमृत महोत्सव या संकल्पनेवर आधारित मल्टी मीडियाच्या चित्रप्रदर्शनच्या उद्घाटन करण्यात आले.

पुढे बोलताना तहसीलदार गाडे म्हणाले की मागील ११ वर्षात शासनाने जनसामान्यांच्या विविध योजना राबविल्या आणि त्याचा उपयोग समाजातील विविध घटनांना मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याचं जीवनमान उंचावत असून जनतेनेही यामध्ये सहभागी व्हाव.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी ,औंढा नागनाथ संस्थानचे प्रशासक तथा तहसिलदार हरिष गाडे,केंद्रीय संचार ब्यूरोचे प्रसिद्धी प्रमुख सुमित दोडल, पोलिस निरीक्षक जी एस राहिरे,नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव,तालुका आरोग्य अधिकारी गजानन चव्हाण,सद्भाव सेवाभावी संस्थेचे डॉ अभयकुमार भारतीया नागनाथ संस्थांनचे वैजनाथ पवार आणि सुरेंद्र डफळ आदी मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने विविध क्षेत्रांमध्ये केलेली उल्लेखनीय कामगिरी आणि देशाचा जलदगतीने केलेला विकास तसेच जनतेच्या कल्याणासाठी सरकारकडून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती या प्रदर्शनातून देण्यात येणार आहे. तसेच भारतीय स्वातंत्र्य आणि फाळणी स्मृतींवर आधारित चित्रांचा समावेशही असणार आहे. एलईडी वॉलच्या तसेच विविध विभागांच्यावतीने शासकीय योजना आणि उपक्रमांची माहिती देण्यात येणार आहे. यात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी, एकात्मिक महिला व बालकल्याण विभागाचे पोषण आहार पाक कृतीच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.तहसील विभागाच्या वतीने आधार नोंदणीचे, तसेच मुख्यमंत्री सहायता निधी नोंदणी स्टॉल,भारतीय स्टेट बँकेच्यावतीने योजनांची माहिती असलेल्या दालन येथे असणार आहे.

पर्यावरणामध्ये विशेष उल्लेखनीय कार्य करत असलेल्या सद्भाव सेवाभावी संस्थेचे डॉ. अभयकुमार भरतीया यांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

एक झाड आईच्या नावे अभियानातंर्गत वन विभागाच्यावतीने आंबा, करंज, जांब, सीताफळ, बांबू , शेवगा आदी पर्यावरणपूरक आणि धार्मिक महत्त्व असलेल्या ५ हजार पेक्षा अधिक वृक्षाचे वितरण करण्यात आले.. महात्मा फुले आणि डायमंड इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते.. सेल्फी बुथ, ३६० डिग्री फोटो बुथ या प्रदर्शनाचे आकर्षण ठरत आहे. या प्रदर्शनास मोठ्या संख्येने नागरिक आणि भाविकांनी भेट दिल्या.

हे प्रदर्शन हिंगोली जिल्ह्यातील आठवे ज्योतिर्लिंग औंढा नागनाथ येथे सर्वांसाठी मोफत खुले असणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या चित्र प्रदर्शनासाठी नागरिक,विद्यार्थी,भाविक यांना आवाहन केंद्रीय संचार ब्यूरो तसेच नागनाथ मंदिर संस्थानच्यावतीने करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# एकीकडे संप तर दुसरीकडे तेलंगणातून गोमांसाची आयात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ ऑगस्ट -**
गोरक्षकांकडुन व्यापाऱ्यांची अडवणुक होत असल्याच्या विरोधात दि. १९ जुलैपासून कुरेशींनी संप पुकारला आहे. हा संप कडकडीत असला तरी दुसऱ्या बाजूने मात्र मोठ्या प्रमाणात गोमांसाची तेलंगणा राज्यातून आयात होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नुकतेच शनिवारी बारड परिसरात गोमांस तस्करी करणाऱ्या वाहनाचा पाठलाग करताना पोलीसांची गाडी उलटल्याची घटना घडली तर हे गोमांस तेलंगाना येथून आयात करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे.

गोवंश हत्या बंदी कायदा लागू असतानाही राज्यात गोवंशाची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याने गोरक्षकाकडून गोवंश वाहतूक करणारी वाहने अडविण्यात येतात. पोलीसांच्या मदतीने हे गोवंश ताब्यात घेऊन गोशाळेत सोडण्यात येतात. गोरक्षकांकडून मोठी वाहने अडवली जात असल्याने गोवंश तस्करांनी आलिशान कारमधून गोवंशाची वाहतूक केल्याचे देखील अनेकवेळा उघड झाले आहे. अनेकवेळा गोरक्षक व गोवंश



तस्करांमध्ये मारहाणीचे प्रकार देखील घडले आहेत.

दरम्यान गोरक्षकांकडून विनाकारण वाहनांची अडणवुक होते. परवानगी तसेच दाखल्याशिवाय वाहतूक करण्यात येत नाही तर जनावरांच्या खरेदी- विक्रीमुळे शेतकऱ्यांचा देखील फायदा नसुन भाकड जनावरे कुठे सोडायची हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण होत असल्याने गोरक्षकांना आवर घालावा या प्रमुख मागण्यासाठी कुरेशी संघटनांनी दि. १९ जुलैपासून बेमुदत संप पुकारला आहे. या संपामुळे जनावरांचे बाजार ओस पडले आहेत तर इस्लामी हॉटेल देखील बंद झाले आहेत. परंतु गोवंशाची कत्तल थांबली असली तरी नांदेड जिल्ह्याच्या सीमेवरील तेलंगणात तथा अन्य राज्यातून गोमांस आयात करण्यात येत आहे आणि शहरातील गोपनीय ठिकाणाहून या गोमांसाची विक्री केली जात आहे. नुकतेच पोलिसांनी बारड परिसरात वाहनाचा पाठलाग करून दीड क्विंटल गोमांस पकडल्याने अन्य राज्यातून गोमांसाची आयात होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकारामुळे एकीकडे कुरेशी संघटनाने पुकारलेल्या संपाला सुरुंग देखील लागला तर दुसरीकडे गोवंश वाहतुकीऐवजी आता गोमांस वाहतुकीला प्रोत्साहन मिळण्याची शक्यता असल्याचे वर्तविण्यात येत आहे.

**गोमांस आयातशी जमीयतुल कुरैश संघटनेचा संबंध नाही : अजीम कुरेशी**

अन्य राज्यातून गोमांसाची वाहतूक होत आहे हे सत्य असले तरी या वाहतुकीशी ऑल इंडिया जमीयतुल कुरैश संघटनेचा कुठलाही संबंध नाही आणि या वाहतुकीचा आमच्या संपावर कुठलाही परिणाम होणार नसून मागण्या मान्य होईपर्यंत संप कायम राहणार असल्याचे ऑल इंडिया जमीयतुल कुरैश संघटनेचे जिल्हाध्यक्ष मोहम्मद अजीम कुरेशी यांनी सांगितले.

**कुरेशी संघटनांचा संप हा केवळ दिखावा : किरण बिचेवार**

गोरक्षक व्यापाऱ्यांची अडवणूक करत असल्याचे खोटे चित्र समाजासमोर आणण्यात आले आहे. मुळात गोरक्षकांनी आतापर्यंत २७५ गुन्हे दाखल केलेले आहेत. त्यात एकाही शेतकऱ्यांवर गुन्हा दाखल नाही. महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त कारवाई नांदेड जिल्ह्यात झालेली आहे. पोलीसांच्या कणखर भूमिकेमुळे गोवंश वाहतुकीवर अंकुश लागला असल्याने कुरेशी संघटना कडून संप पुकारण्याचा देखावा करण्यात आला आहे. या संपाच्या नावाखाली पोलीसांची दिशाभूल करून छुप्या पद्धतीने गोवंश तसेच गोमांसाची वाहतूक होत असुन हे तामसा व बारड येथील घटनेवरुन सिद्ध झाले असून गोवंश वाहतुक रोखण्यासाठी गोरक्षक नेहमीच सज्ज असल्याचे प्रांत गोशाळा संपर्क प्रमुख किरण बीचेवार यांनी सांगितले.

**महामार्ग पोलीसांनी जप्त केलेले गोमांस सगे-सोयऱ्यांना वाटप ?**

महामार्ग पोलिसांनी मदत केंद्रावर तेलंगानातून येणाऱ्या गाडी क्रमांक टी .एस १६ ई पी २००२ या वाहनाचा पाठलाग करुन दिड क्वींटल गोमांस पकडले याच कारवाई दरम्याना पाठलाग करताना पोलीसांचे वाहन उलटले यात तीन कर्मचारी जखमी झाले. महामार्ग पोलिसांनी ताब्यात घेतलेली कार पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करून अपघाताची नोंद करून घेतली. परंतु यानंतर जप्त केलेले दीड क्विंटल गोमांस नेले कोणी याचा मात्र पत्ता लागला नाही. गावातील एकाने गोमांसाची परस्पर विल्हेवाट लावल्याची चर्चा मात्र चांगलीच रंगली आहे. पिशवीत आणलेले ७० किलो गोमांस भोकर व नांदेड येथील सगे- सोयऱ्यांना पाठविल्याची चर्चा असुन सगे- सोयऱ्यांना गोमांस वाटप करणाऱ्या बहुचर्चित समाजसेवकावर कोणती कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पोलीसांच्या सर्तकतेमुळे वाचला युवकाचा जीव

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ ऑगस्ट -**
नरसी पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या रामतिर्थ पोलीस प्रशासनाची तत्परता सायबर सेलच्या तांत्रिक मदतीने किन्हाळा येथील युवकाचा जिव वाचला! रामतीर्थ पोलीस स्टेशनचे स.पो.नी विक्रम हराळे यांच्या सतर्कतेमुळे अज्ञात ठिकाणी जखमी बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या युवकाला वेळेवर शोधून प्राण वाचविण्यात रामतिर्थ पोलीसांना यश आले.या धाडसी व सेवाभावी कार्यतत्परते मुळे सर्वत्र कौतुक होत आहे.

बिलोली तालुक्यातील किनाळा गावातील आनंदा परशुराम उगे वयवर्ष ३२ हे दि.१०ऑगस्ट सायंकाळी ७ वाजतापासून अचानक बेपत्ता झाले. रात्री उशिरा पर्यंत घरी न परतल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांसह गांवकरी आणि सरपंच विठ्ठल माने यांनी त्यांचा सर्वत्र शोध घेतला. त्यांचा मोबाईल फोन लागत होता, परंतु कॉल रिसीव्ह केला जात नव्हता. त्यामुळे काळजी अधिकच वाढली. रात्री ११:४० वाजता कुटुंबीयांनी रामतीर्थ पोलीस स्टेशनला धाव घेतली असता. रामतिर्थ चे सपोनी विक्रम हराळे यांना संपूर्ण घटनेची तपशीलवार माहिती दिली. ही बाब गांभीर्याने घेत, सपोनी हराळे यांनी तपासाची चक्र विना विलंब न करता तत्काळ सायबर सेलची मदत घेतली. अवघ्या २० मिनिटांत तांत्रिक पद्धतीने मोबाईलचे लोकेशन मिळवून संबंधित युवक नांदेडदेगलूर महामार्गावर धुपा ते किनाळा रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी व बेशुद्ध अवस्थेत पडलेला आढळून आला. सध्याच्या परिस्थिती मध्ये त्या युवकावर वैद्यकीय उपचार सुरू असून त्याची प्रकृती अता स्थिर आहे.

या संपूर्ण कार्यवाहीत रामतीर्थ पोलीस स्टेशनचे सपोनी विक्रम हराळे ह्यांनी सायबर सेलची घेतले ल्या मदतीमुळे व वेळेवर मदत मिळाल्या मुळे एक अमूल्य जीव वाचला. या कार्यामुळे पोलीस दलाच्या कार्यक्षमतेवर जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## संक्षिप्त वृत्त



### लाडक्या बहिणीने पाठवल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राखी व संदेश

**मुदखेड**-मुदखेड शहरातील न्याहाळी व वसंत नगर तांडा बुथ क्रमांक २८२ येथे दि.९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा जिल्हा अध्यक्ष किशोर देशमुख यांच्या आदेशानुसार शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण व महिला पदाधिकारी यांच्या उपस्थितीत न्याहाळी व वसंत नगर तांडा प्रभागातून २०१ लाडक्या बहिणीने पाठवल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राखी व समस्या संदेश. यावेळी भाजपा शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, माजी नगरसेवक संजय आऊलवार, महिला शहराध्यक्ष जयश्री ताई देशमुख, शहर महामंत्री प्रभाकर पांचाळ, विनोद चंद्रे,उत्तम गिरी, प्रियंका खंदारे,संजय चव्हाण,मानसिंग गीरी,संजय गीरी, रावसाहेब गिरी,बालाजी गीरी,अशोक गीरी, उतम पावडे,तुळशीराम गिरी,रमेश गिरी,शेट्टीबा. यांच्यासह न्याहाळी येथील असंख्य महिला भाजपा पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

### शिवसेना शिंदे गटात पंडित गजभारे यांचा पक्षप्रवेश


**नांदेड**-शिवसेना शिंदे गटाच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत गोपाळ चावडी येथील सामाजिक कार्यकर्ते पंडित गजभारे यांनी दिनांक २८



जुलै २०२५ रोजी शिवसेना शिंदे गटात शिवसेनेचे उपनेते हेमंत पाटील व दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील भांडारकर यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला. शिवसेना उपनेते हेमंत पाटील यांच्याशी पहिले पासूनच राजकारणात नाळ जुळलेली होती पंडित गजभारे हे यापूर्वीही हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय क्षेत्रात काम केलेले होते म्हणून पंडित गजभारे यांनी दिनांक २८ जुलै २०२५ रोजी सिडको येथे झालेल्या शिवसेना शिंदे गटाच्या बैठकीस उपस्थित राहून हेमंत पाटील व दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील भांडारकर यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला यावेळी शिवसेनेचे दक्षिणचे पदाधिकारी सुहास खराने, विनय गिडे, मारुती धुमाळ, सतीश खैरे, राजेंद्र कुलते ,महिला आघाडीच्या स्मिता कुलकर्णी, गजानन राजुरवार, रावसाहेब तारू, बाळासाहेब देशमुख, सुधीर बागल, पप्पू गायकवाड यांच्यासह सिडकोतील शिवसेना आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. पंडित गजभारे यांनी पक्षप्रवेश केल्याबद्दल सर्व शिवसैनिकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

### हॅप्पी टू हेल्प आणि जारा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर

**नांदेड**- भारत देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त १० ऑगस्ट २०२५ रविवारी रोजी हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन आणि जारा फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमानाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे रक्तदान शिबीर न्यू बायजीपुरा कॉर्नर, सेंट्रल नाका रोड, अलहुदा



मुलीची माध्यमिक शाळेच्या बिल्डिंगमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरू होते. भारत देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त देशासाठी समर्पित हा भव्य रक्तदान शिबीर ठेवण्यात आले होते. शिबिरात ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे या सर्व रक्तदात्यांचे आभार मानत सर्वांना पेन गिफ्ट करण्यात आलें. रक्त संकलनाचे कार्य संजीवनी रक्त केंद्राच्या सर्व टिमने केले. संजीवनी रक्त केंद्राच्या सर्व टीमला ही हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनतर्फे पेन गिफ्ट करण्यात आले. हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन तर्फे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर व इतर सहकाऱ्यांनी आणि जारा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जावीद मुकीम पटेल व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### कोसमेट येथील कावड यात्रेचे इस्लापूर शहरात जंगी स्वागत

**इस्लापूर** -श्रावण मासाचे औचित्य साधून कोसमेट ते सहस्त्रकुंड या ठिकाणी कावड यात्रेचे आयोजन विविध हिंदू संघटनेच्या वतीने करण्यात आली होते. तब्बल दहा किलोमीटरचा प्रवास कावड खांद्यावर घेऊन हर हर महादेव चा जयघोष करत या कावड यात्रेत सहभागी झालेल्या नवयुवक तरुणांनी पायी चालत केला. या कावड यात्रेचे स्वागत इस्लापूर येथील विविध धार्मिक, संघटनेच्या प्रमुखांनी शनी मंदिर देवस्थानाच्या ठिकाणी दूध व केळी वाटून त्यांच्या फराळाची व्यवस्था केली. व या कावड यात्रेचे जंगी स्वागत केले.

## माहूरगड परिक्रमा यात्रा
# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या महाप्रसादाचा लाखो भाविकांनी घेतला लाभ



**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. ११ ऑगस्ट -**
आपण जे मिळवतो त्यावरून आपण जगतो, पण आपण जे देतो त्यावरून आपण जीवन जगतो . जर तुम्ही शंभर लोकांना खाऊ घालू शकत नसाल तर फक्त एकाला खाऊ घाला. अन्नदान हे सर्व दानांमध्ये श्रेष्ठ दान' मानले जाते.अन्नदान ही भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाची परंपरा आहे.अन्नछत्र ही संकल्पना याच श्रद्धेवर आधारित आहे. आणि याच प्रेरणेतून ही धार्मिक परंपरा जोपासत निस्वार्थ भावनेने आणि गरजूंना मदत करण्याच्या उद्देशाने माहूरगड येथील श्री दत्तात्रेय शिखर संस्थान दत्तात्रेय मंदिर येथील परिक्रमा यात्रे दरम्यान शहरातील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या भव्य महाप्रसादाचा लाखो भाविकांनी लाभ घेतला.

दिनांक ९ ऑगस्ट रोजी मनीष पाटील मित्र मंडळ, यवतमाळ यांच्या सहकार्याने आणि श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या आयोजनातून हा महाआयोजन करण्यात आले. यात्रेतील भाविकांसाठी पहाटे ३ वाजल्यापासून ते रात्री ११ वाजेपर्यंत महाप्रसादाची अखंड सेवा सुरू होती. या सेवेसाठी ३० क्विंटल तांदूळ, २ क्विंटल बुंदी, १ क्विंटल सुजीचा शिरा असे स्वादिष्ट पदार्थ प्रेमाने भाविकांसमोर वाढण्यात आले. यात्रेच्या गर्दीत भाविकांना चहा व बिस्कीट याचीही सोय उपलब्ध होती, ज्यामुळे दिवसभर यात्रेतील थकवा दूर झाला.

सेवेत श्री स्वामी समर्थ अन्नछत्रातील विश्वस्त मंडळ आणि माहूर,ढोकी करंजखेड येथील स्वामी समर्थ सेवेकरी मंडळी अहोरात्र कार्यरत होती. 'अन्नदाता सुखी भव' या भावनेने सेवेकऱ्यांनी प्रत्येक भाविकाला प्रेमाने प्रसाद देत आपली सेवा पूर्ण केली.

महाप्रसादाची उत्तम मांडणी, सुयोग्य नियोजन आणि सेवाभावाची सेवा भावना पाहून भाविकांनी समाधान व्यक्त केले. अनेकांनी हा अनुभव आयुष्यातील अविस्मरणीय क्षण असल्याचे सांगितले. माहूरगडच्या पवित्र वातावरणात अन्नछत्र मंडळाने साकारलेला हा सेवायज्ञ भक्ती, दान आणि मानवतेचा अद्वितीय संदेश देऊन गेला.

माहूर सारख्या धार्मिक तिर्थक्षेत्र ठिकाणी येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून मागील अनेक वर्षांपासून चालवलेले जाणारे अन्नछत्र म्हणजे जेथे देवदर्शनासाठी आलेल्या गरजू यात्री भाविकांना आणि प्रवाशांना मोफत अन्न महाप्रसाद म्हणून दिले जाते असे अन्नपूर्णा ठिकाण होय. या ठिकाणी चालविण्यात येणारे अन्नछत्रातून अन्नदान हे एक प्रकारचे धर्मादाय कार्य आहे, जिथे धार्मिक आणि सामाजिक भावनेतून अन्नदान केले जाते. याठिकाणी मोफत भोजनाची व्यवस्था: येथे, गरजूंना, विशेषतः प्रवाशांना, मोफत जेवण दिले जाते. धार्मिक श्रद्धेने आणि सामाजिक बांधिलकीतून हे अन्नछत्र चालवल्या जाते.


गरिबांना आणि गरजूंना अन्न उपलब्ध करून देणे, प्रवाशांना जेवणाची सोय करणे, अन्नदानासारख्या धार्मिक आणि सामाजिक कार्यांना प्रोत्साहन देणे, समाजात अन्नसुरक्षा आणि समता निर्माण करणे. याच उद्देशाने सामाजिक बांधिलकी व धार्मिक परंपरेतून माहूर चे स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळांकडून भाविकांसह गरजूंना यात्राकाळात महाप्रसाद व दररोज स्वच्छ आणि सकस अन्न हे धार्मिक स्थळांचे सर्व नियम पाळून श्रद्धा आणि भक्ती मार्गातून मोफत अन्नदान अविरतपणे सुरू आहे.



नांदेड- शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने केंद्र सरकार व राज्य सरकार विरोधात महात्मा फुले पुतळा येथे महाराष्ट्र जनआक्रोश आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख बबनराव बारसे, शिवसेना जिल्हा प्रमुख भुजंग पा. डक, शिवसेना जिल्हा प्रमुख ज्योतीबा खराटे, आदीसह शिवसैनिक पदाधिकारी मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

### हुल्लाजी शिराळे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ ऑगस्ट -**



बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी जेष्ठ नागरिक हुल्लाजी मष्णाजीराव शिराळे यांचे रविवार दि.१० ऑगस्ट रोजी रात्री ९:३० वाजता अल्पशा आजाराने दुखःद निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर सोमवार दि.११ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता आदमपूर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली,सूना,जावई,नातवंड असा मोठा परिवार आहे.आदमपूरचे हार्डवेअर व्यावसायिक मारोती शिराळे यांचे वडील तर अनिल चिगळे यांचे अजोबा होते.

# भोकरच्या नायब तहसीलदारांवर कारवाई करण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ११ ऑगस्ट -**
तहसील मधून बोगस प्रमाणपत्र देणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी तक्रार दि.१८ जून रोजी देण्यात आली होती परंतू तहसील प्रशासनाकडून संबधित अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही वरिष्ठांकडून त्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न होतो संबधिताविरुध्द सर्वसामान्यांच्या अनेक तक्रारी असून त्यांचेवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा अमरण उपोषण करण्याचा ईशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हासरचिटणीस रवि गेंटेवार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

ज्या व्यक्तिला प्रमाणपत्र देण्यात आले त्या व्यक्तीचे सर्व कागदपत्रे उमरी तालूक्यातील असताना भोकर तहसील कार्यालयातून नायब तहसीलदार यांनी आपल्या स्वतः च्या लॉगीनमधून बोगस प्रमाणपत्र दिले आहे.नियमाला डावळून प्रमाण देण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी निवेदनात केला आहे.वृध्द महिला अपंग शाळकरी मूले ग्रामीण भागातील शेतकरी सर्वसामान्य नागरीकांना विविध प्रमाणपत्रासाठी नाहक त्रास होत आहे.माझी तक्रार कूठेही करा माझे काही होणार नाही असे अधिकारी बोलत आहेत तरी बोगस प्रमाणपत्र देणाऱ्या संबधित नायब तहसीलदारांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा दि.१५ आँगष्ट पासुन तहसील समोर अमरण उपोषण करण्याचा ईशारा रवि गेंटेवार यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# मुलांमधील मोबाईलच्या अति वापराला आळा घालण्यासाठी राष्ट्रीय मोहीम राबवा : खा. डॉ. गोपछडे

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ ऑगस्ट -**
भारतातील मुलांमध्ये मोबाईल फोनच्या अतिवापरामुळे होणारे गंभीर सामाजिक आणि शारीरिक नुकसान टाळण्यासाठी भारत सरकारने एक राष्ट्रीय अभियान उभारावे आणि मोबाईलच्या अधीन जाणाऱ्या बालकांसाठी नवसंजीवनी द्यावी अशी मागणी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आज राज्यसभेत केली . मुलांकडून मोबाईलचा होत असलेला अति वापर गंभीर असल्याबद्दल त्यांनी आज राज्यसभेचे लक्ष वेधले.

खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पुन्हा एकदा लोकहिताची बाब सभागृहासमोर मांडली. ते म्हणाले , भारतातील मुलांमध्ये मोबाईल फोनचा अतिवापर



ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. या सवयीचा मुलांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.स्मार्टफोनचा जास्त वापर मुलांमध्ये चिंता, नैराश्य आणि चिडचिडेपणा वाढवू शकतो. स्क्रीनवर जास्त वेळ घालवल्याने झोपेचा अभाव, डोळ्यांच्या समस्या आणि मानसिक ताण येतो.याशिवाय, या सवयीमुळे लहान वयातच लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयरोग इ. समस्या उद्भवू शकतात. केस पांढरे होणे आणि थकवा यांसारखी वृद्धत्वाची लक्षणे देखील लहान वयातच दिसून येतात. मुलींमध्ये हार्मोनल असंतुलन देखील होऊ शकते. मोबाईलचा अतिरेकी वापर मुलांचे लक्ष अभ्यास आणि सृजनशील गतिविधी ऐवजी केवळ डिजिटल जगाकडे वळवतो, ज्यामुळे त्यांच्या शिकण्याच्या क्षमतेवर आणि सामाजिक कौशल्यांवर नकारात्मक परिणाम होतो. केरळमध्ये गेल्या अडीच वर्षांत इंटरनेटच्या व्यसनामुळे २५ मुलांचा मृत्यू झाला आहे. ही गंभीर समस्या पाहून स्थानिक पोलिसांनी दीड वर्षांपूर्वी डी-डॅड (डिजिटल व्यसनमुक्ती) नावाची मोहीम सुरू केली.मुलांना मोबाईलच्या अतिवापरापासून मुक्त करण्यासाठी विविध ठिकाणी केंद्र स्थापन करण्यात आली आहेत.

या आव्हानाला तोंड देण्यासाठी पालकांनी मुलांच्या स्क्रीन टाइमसाठी स्पष्ट नियम बनवावेत,त्यांच्या ऑनलाइन क्रियाकलापांवर लक्ष ठेवा आणि त्यांना अभ्यास, खेळ आणि इतर नॉन-डिजिटल गतिविधी मध्ये अधिक वेळ घालवण्यास प्रोत्साहित करा. तसेच, मुलांना साहित्य वाचण्यास प्रोत्साहित करा.यासाठी एक व्यापक राष्ट्रीय मोहीम सुरू केली पाहिजे, जेणेकरून त्यांचा सर्वांगीण विकास योग्य दिशेने होऊ शकेल असेही खा. डॉ. अजित गोपछडे यांनी राज्य सभेत मत मांडले.

### श्रावण पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ ऑगस्ट -**
नांदेड जिल्ह्यातील श्रध्दावान बौद्ध उपासक उपासिका व बालक बालिका यांच्या उपस्थितीत पुज्य भंते बोधीधम्मो यांच्या मार्गदर्शनाखाली तपोवन बुद्ध भुमी गोळेगाव ता. लोहा येथे श्रावण पौर्णिमेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.त्यामध्ये भंतेजीची धम्मदेसना; समता सैनिक दलाचे साप्ताहिक परेड; सुत्रपठन; उपोसत धारकांसह चारीका; दानपारामिता या कार्यक्रमांनी पंचक्रोशीतील सर्व श्रद्धावान उपासक उपासिका यांचे लक्ष वेधले.

# महावितरणचा 'अंधारमय खेळ' ; स्मार्ट मीटरच्या नावाखाली डोळस लुट!

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ ऑगस्ट -**
नायगांव तालुक्यातील महावितरण उपविभागा अंतर्गत येणाऱ्या ऐंशी गांवापैकी नायगांव, नरसी, मूगांव मरवाळी सह अन्य गावात 'स्मार्ट मीटर' लाव ण्याच्या नावांखाली विज ग्राहकांची सर्रास आर्थिक लूट सुरु असून, या प्रक्रियेमध्ये कोणतीही पारदर्शक ता, नियमबद्धता किंवा जबाबदारी नाही.व अनुभव शून्य, अशिक्षित युवकांकडून जबरदस्तीने मीटर लावले जात असून, जुन्या योग्य मीटरमध्ये बिघाड असल्याचे भासवून नविन मीटर बसवले जात आहेत आणि त्यासाठी विजकंजूमरकडून बेकायदेशीररीत्या अव्वाच्या सव्वा पैसे वसूल केले जात आहेत,असा गंभीर आरोप सामाजिक कार्य कर्ते प्रभाकर शिंदे यांनी केला आहे.



शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, तालुक्यातील महावितरण विभागातील ठराविक अधिकाऱ्यांच्या संगनमताने कंत्राटदार कंपनी नियम झुगारून काम करत असून, अशिक्षित व अल्पशिक्षित युवकांकडून केवळ वर्क ऑर्डरच्या नावाखाली 'स्मार्ट मीटर' लावण्याचे काम चालवले जात आहे. यामुळे मीटर मध्ये तांत्रिक चुका, वीज बिलांमध्ये गोंधळ यामुळे नायगांव तालुक्यातीलविजग्राहकांच्या मनस्तापाला सुरुवात झाली आहे.

**एकाच व्यक्तीकडून सर्व कामांची जबाबदारी?**

वीज मीटरचे बसवणे, वाचन (रीडिंग) घेणे आणि फॉल्टी मीटर बदलणे ही तिन्ही कामे एका व्यक्तीकडून करवून घेण्यात येत आहेत, ही बाबच महावितरणच्या कार्यपद्धतीवर मोठा सवाल उप स्थित करणारी असुन. ग्राहकांच्या म्हणण्यानुसार,विज ग्राहकाचे जुने मीटर व्यवस्थित असूनही 'तो बिघडला आहे' असा बनाव रचून, नविन मीटर बसवले जात आहेत. त्यासाठी ग्राहकांकडून काही रुपयांची मागणी ही केली जात आहे, ही थेट लाच लुचपतच ठरते.

**महावितरण विभागातील अधिकारीच कंत्राटदाराच्या पाठीशी?**

महावितरणचे काही वरिष्ठअधिकारी कंत्राटदाराच्या बाजूने वागत असून, या गैरप्रकारांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही सामाजिक कार्य कर्ते प्रभाकर शिंदे यांनी केला. या सर्व प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधित एजन्सीचे कंत्राट तात्काळ रद्द करावे,ती एजन्सी काळ्या यादीत टाकावे , आणि महावितरण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. या आर्थिक लुटी विरोधात आता जनआंदोलन उभं राहत असून, १४ ऑगस्टपासून अधीक्षक अभियंता महावितरण, नायगांव यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती शिंदे यांनी दिली. ग्राहकांच्या खिशावर डल्ला टाकणाऱ्या या लुटारू कंत्राटदाराला आणि त्याला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्याची हीच वेळ आहे, असे ते यावेळी म्हणाले.